१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, गुरुवार ७ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक-६३, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 63 Marathi - Daily - Mumbai, 7 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

navakal.in


पुण्याच्या घटनेनंतर 'नो पॅरोल'चा मोठा निर्णय.

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews


# महाराष्ट्रातील सरकारी कर्मचाऱ्यांवर हिंदी परीक्षा सक्ती
# मनसे संतापली! वाद होताच सरकारची तात्पुरती माघार

■ मुंबई

**महाराष्ट्र सरकारच्या भाषा संचालनालयाने राज्यातील राजपत्रित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषेची परीक्षा घेण्याची घोषणा आज केली. या निर्णयावर तीव्र आक्षेप घेत मनसे, उबाठा आणि मराठी अभ्यास केंद्राने मराठी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर हिंदी परीक्षेची सक्ती कशासाठी? असा सवाल केला. ही परीक्षा तत्काळ रद्द करावी, अन्यथा राज्यभर आंदोलन छेडू, असा इशाराही दिला. यावरून वाद होताच राज्य सरकारने अखेर या परीक्षेला तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. मात्र, याबाबत सविस्तर आढावा घेऊन गरज असल्यास परीक्षा सुरू ठेवू, असे सरकारने म्हटले आहे.**




**महाराष्ट्र** राज्य भाषा संचालनालयाने जारी केलेल्या निवेदनानुसार, राजपत्रित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी हिंदी निम्न व उच्च श्रेणी परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २० मे ठेवण्यात आली होती, तर परीक्षा २८ जून रोजी घेण्यात येणार होती. मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या चार विभागीय केंद्रांवर ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती. हे निवेदन प्रसिद्ध होताच मनसेने संताप व्यक्त केला. मनसेचे संदीप देशपांडे राज्य सरकारवर टीका करत म्हणाले की, महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने मराठी भाषा शिकावी आणि अधिकाऱ्यांशी मराठीतूनच संवाद साधायला हवा. अधिकाऱ्यांनी हिंदी शिकून नागरिकांशी हिंदीत बोलावे, अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. राज्य सरकार दिल्लीत बसलेल्या लोकांना खूश करण्याचा प्रयत्न करत आहे. एकीकडे आपण मराठीचा आग्रह धरतो आणि दुसरीकडे अधिकाऱ्यांवर हिंदी परीक्षा लादतो, याचा अर्थ काय? महाराष्ट्राची राजभाषा मराठी आहे. त्यामुळे येथे अधिकाऱ्यांना हिंदी येणे गरजेचे नाही. सरकारी काम आहे, त्यांनी मराठी जाणणे आवश्यक आहे. हिंदी परीक्षा घेऊन शासन हिंदीचा प्रचार करत असेल, तर त्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. ही परीक्षा अधिकाऱ्यांसाठी अनिवार्य करू नका.

मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार म्हणाले की, महाराष्ट्राची राजभाषा मराठी असल्याने सरकारी कर्मचाऱ्यांना मराठीतून पत्रव्यवहार व संवाद करता येणे बंधनकारक करणे व त्यासाठी त्यांच्या सेवापूर्व व सेवांतर्गत परीक्षा घेणे आवश्यक आणि अपेक्षितच आहे. परंतु, प्रशासकीय व्यवहाराची तसेच संवादाची भाषा मराठी असताना कर्मचाऱ्यांचे हिंदी भाषेचे ज्ञान तपासण्याची व त्यासाठी प्रतिवर्षी परीक्षा घेण्याची गरज काय? एक तर हिंदी ही महाराष्ट्राची राजभाषा नाही. राज्यात हिंदी साक्षरतेचे प्रमाणही प्रचंड आहे. या दोन्ही भाषांमध्ये खूप साधर्म्य आहे. मराठी माणसाला हिंदीतून कामचलाऊ व्यवहार करण्यात कोणतीही अडचण नाही. असे असताना शासकीय कर्मचाऱ्यांना हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक करून त्यासाठी परीक्षा घेणे हा निव्वळ खोडसाळपणा आणि राजभाषा मराठीचा अवमान आहे.

यावर प्रतिक्रिया देताना उबाठाचे खासदार संजय राऊत म्हणाले की, आमचा हिंदीला विरोध नाही. मात्र मराठी ही पहिल्या क्रमांकाची भाषा आहे. राष्ट्रीय स्तरावर काम करण्यासाठी हिंदी आणि इंग्रजी उपयुक्त आहेत.

वाद चिघळल्यानंतर मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी हस्तक्षेप करत ही परीक्षा तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. सामंत म्हणाले की, याची माहिती मिळाल्यानंतर मराठी भाषा विभागाचे प्रधान सचिव किरण कुलकर्णी यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर सध्या नियोजित हिंदी भाषा परीक्षेला स्थगिती देण्यात आली आहे. भविष्यात ही परीक्षा घेण्याची आवश्यकता आहे का, याचा सविस्तर आढावा » पान ७ वर

## बंगाल निकालानंतर हिंसाचार तृणमूल कार्यालयावर बुलडोझर

**पश्चिम बंगालमध्ये निवडणूक निकालानंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राजीनामा न देण्याची भूमिका घेतली असतानाच राज्यात हिंसाचार उफाळून आला आहे. त्यात गेल्या २४ तासांत चार जणांचा मृत्यू झाला आहे. समाजकंटकांनी केलेल्या हल्ल्यात पाच सुरक्षा कर्मचारी जखमी झाले आहेत. काल रात्रभर जाळपोळ, तोडफोड याचे सत्र चालू होते. कोलकात्यात तृणमूल काँग्रेसचे कार्यालय बुलडोझर लावून पाडण्यात आले. या हिंसाचारावरून भाजपा आणि तृणमूल यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले आहेत.**



■ कोलकाता

**राज्यात** गेल्या २४ तासांत हत्या करण्यात आलेल्यांमध्ये भाजपा आणि तृणमूलचे प्रत्येकी दोन कार्यकर्ते आहेत. उत्तर २४ परगणा आणि हावडा येथे आपल्या दोन कार्यकर्त्यांची हत्या केल्याचा आरोप भाजपाने तृणमूलवर केला आहे. कोलकाता आणि बीरभूम येथे भाजपा समर्थकांनी आपल्या पक्षाच्या दोन सदस्यांची हत्या केल्याचे तृणमूलने म्हटले आहे.

कोलकात्याच्या न्यू मार्केट परिसरात काल रात्री जमावाने तृणमूल काँग्रेसच्या पक्ष कार्यालयावर बुलडोझर » पान ७ वर


सिद्ध KALCIYOG®
कॅल्सीयोग
आयुर्वेदिक कॅल्शियम टॅब्लेटस्
• हाडांचे आणि सांध्यांचे टॉनिक.
• हात, पाय, कंबर, गुडघे, पाठ, सांधे दुखणे यासाठी उत्तम. • केस गळणे कमी होते. • स्नायू, लिगामेंट दुखापतीवर प्रभावी.
Amazon वर कॅश ऑन डिलिव्हरी उपलब्ध
डॉ. अभिजीत 9422011723
धौतीयोग चे प्रभावी उत्पादन


## बंगाल जिंकल्यानंतर मोदी पहिल्यांदाच गुजरात दौऱ्यावर

**अहमदाबाद** - पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या ऐतिहासिक विजयानंतर पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदी ११ मे रोजी गुजरात दौऱ्यावर येत आहेत. मोदींच्या या दौऱ्यामुळे संपूर्ण गुजरातमधील भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे भरते आले आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार मोदी रविवारी १० मे रोजी रात्री जामनगर विमानतळावर



उतरतील. रात्री त्यांचा मुक्काम जामनगर शहरातच असेल. सोमवारी ११ मे रोजी ते सोमनाथला स्वाभिमान पर्व सोहळ्यासाठी जातील. तेथून मोदी थेट वडोदरा येथे सरदार धाम-३ चे उद्घाटन करतील. त्यानंतर वडोदरामध्ये त्यांचा रोड शो होण्याची शक्यता आहे. ३० ते ४० हजार लोक या रोड शोमध्ये सहभागी होतील, असा अंदाज आहे. या ठिकाणी पाटीदार समाजाकडून मोदी यांना सरदार गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. गुजरात दौऱ्यात मोदी काही धार्मिक, सामाजिक आणि विकास कामांशी संबंधित कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. सर्वप्रथम मोदी सोमनाथ स्वाभिमान पर्व सोहळ्याला उपस्थित राहतील.

## पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन एकरी १ कोटी ६१ लाखांचा दर

■ पुणे

**पुरंदर** येथील प्रस्तावित छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रियेला वेग आला आहे. प्रशासनाने प्रकल्पासाठी प्रति एकर १ कोटी ६१ लाख १ हजार ९२५ रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. ७ मेपासून शेतकऱ्यांच्या खात्यावर आरटीजीएसद्वारे थेट रक्कम वाटपाची प्रक्रिया सुरू होणार आहे. ही प्रक्रिया १० जूनपर्यंत चालणार आहे. ज्या दिवशी करारनामा केला जाईल, त्याच दिवशी मोबदला शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केला जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली.

जिल्हाधिकारी डूडी म्हणाले की, प्रकल्पासाठी एकूण १,२१६ हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे. पुरंदर तालुक्यातील सात गावांमधील मोजणी पूर्ण झाली

### ७ मेपासून पैसे वाटप

आहे. सुमारे ३ हजार एकर जमीन अंतिम करण्यात आली आहे. ५ मे रोजी भूसंपादन प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी सुमारे साडेचारशे एकर जमिनीचे करारनामे करण्यात आले. सहमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना अतिरिक्त १० टक्के परतावा देण्यात येणार आहे. कुटुंबातील एका » पान ७ वर

## तामिळनाडूत थलापती विजय आज मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार

■ चेन्नई

### काँग्रेसचा पाठिंबा



**तामिळनाडू** विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक १०८ जागा जिंकणारे टीव्हीके पक्षाचे प्रमुख थलापती विजय उद्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. त्यांनी आज राज्यपाल विश्वनाथ अर्लेकर यांची भेट घेऊन सरकार स्थापन करण्याचा दावा केला. त्यापूर्वी, काँग्रेसच्या नेत्यांनी टीव्हीकेच्या मुख्यालयात जाऊन विजय यांना पाठिंब्याचे पत्र सादर केले. मात्र, काँग्रेसचा पाठिंबा घेतला तरी विजय यांना आणखी पाच आमदारांची गरज भासेल. तामिळनाडूत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. मात्र तामिळी सुपरस्टार विजय यांचा तमिलगा वेट्री कळघम (टीव्हीके) पक्ष » पान ७ वर

## आंतरधर्मीय विवाहानंतर पारशी महिलेला समाजातून बहिष्कृत करणे भेदभावपूर्ण

■ नवी दिल्ली

### सर्वोच्च न्यायालयाची टिपणी

**धर्माबाहेर** विवाह करणाऱ्या पारशी झोराष्ट्रीयन महिलांच्या बहिष्काराच्या प्रथा म्हणजे भेदभाव असल्याचे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. आंतरधर्मीय विवाह केल्यास पारशी महिलांना स्वःधर्माचे अधिकार नाकारणाऱ्या प्रथेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

या प्रकरणाच्या सुनावणीवेळी न्यायालयाने म्हटले की, अशा प्रकारचा निवडक बहिष्कार भेदभाव निर्माण करतो. संविधानातील कलम २५ अंतर्गत धर्माचा अधिकार हा जन्मसिद्ध आहे आणि विवाहामुळे तो हिरावून घेता येत नाही. हीच गोष्ट



पुरुषांना लागू केली जात नाही. ती स्त्री-पुरुषांना समानपणे लागू झाली पाहिजे. अन्यथा सर्वच समाजांवर याचा व्यापक परिणाम होऊ शकतो.

ही याचिका दाखल करणाऱ्या पारशी महिलेच्या वतीने वरिष्ठ वकील दारियस खांबाटा यांनी युक्तिवाद केला. त्यांनी न्यायालयाला सांगितले की, झोराष्ट्रीयन धर्म अत्यंत प्रगत विचारांचा आहे. ही प्रथा मानवनिर्मित आहे. त्यामुळे या दाव्याला पाठिंबा देणारे धार्मिक ग्रंथ सापडणे कठीण आहे. तर महिलेने सांगितले की, मी श्रद्धाळू आहे. मी माझा धर्म सोडलेला नाही, मी त्यावर विश्वास ठेवते. फक्त लग्न केल्यामुळे मला समाजातून वगळण्यात आले.

## रेडिओ क्लब जेटीसाठी नव्या निविदा प्रकल्प २४ महिन्यांत पूर्ण करण्याची अट

■ मुंबई

**महाराष्ट्र** मेरीटाईम बोर्डने (एमएमबी)गेटवे ऑफ इंडिया जवळील रेडिओ क्लब जेटीचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी नव्या कंत्राटदाराची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. नव्या कंत्राटदाराला उर्वरित काम २४ महिन्यांत पूर्ण करावे लागणार आहे. रेडिओ क्लब जेटीचे काम पूर्ण झाल्यावर रेडिओ क्लब जेटी एकाच वेळी २० वॉटर टॅक्सी सामावून घेऊ शकेल. या प्रकल्पामुळे दक्षिण मुंबईला कल्याण, डोंबिवली, ठाणे, वसई आणि नवी मुंबईशी जोडणाऱ्या वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्यास मदत होणार आहे.

मुंबईच्या जलवाहतुकीला बळकटी देण्यासाठी आणि गेटवे ऑफ इंडियाहून विविध मार्गांवरील कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी हा जेटी प्रकल्प गेल्या वर्षी सुरू करण्यात आला होता. मात्र, विद्यमान कंत्राटदाराच्या धीम्या प्रगतीमुळे प्रकल्पाला विलंब झाला. एमएमबी अधिकाऱ्यांच्या मते, फेब्रुवारीपर्यंत सुमारे ५० टक्के काम पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु केवळ १० टक्के कामच पूर्ण झाले आहे. या विलंबामुळे कंत्राटदाराची निविदा रद्द करण्यात आली. आता एमएमबीने उर्वरित कामासाठी नवीन निविदा काढली असून, इच्छुक कंपन्या २९ मेपर्यंत बोली सादर करू शकतात. उर्वरित बांधकामाचा खर्च सुमारे १९६ कोटी रुपये इतका अंदाजित आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, पावसाळ्यात समुद्री बांधकामावर मर्यादा येत असल्याने निविदा प्रक्रिया त्या काळात सुरू राहील.

## राष्ट्रवादी शरद पवार गटाचे केरळमधूनही अस्तित्व पुसले

■ मुंबई

**केरळ** विधानसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठा धक्का बसला असून, या निकालांनंतर देशातील कुठल्याच राज्यात त्यांचे आमदार उरलेले नाहीत. केरळमधील डाव्या लोकशाही आघाडीसोबत (एलडीएफ) निवडणूक लढवणाऱ्या शरद पवार गटाने या निवडणुकीत तीन जागा लढवल्या होत्या. त्यातील एकाही जागेवर त्यांना विजय मिळवता आलेला नाही. यापूर्वीच्या विधानसभेत शरद पवार गटाचे दोन आमदार होते. जागावाटपात राष्ट्रवादीच्या वाट्याला तीन जागा आल्या होत्या. मात्र, तिन्ही जागांवर पक्षाच्या उमेदवारांचा पराभव झाल्याने विधानसभेतील पक्षाचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. एलाथूर मतदारसंघातून सलग चौथ्यांदा निवडणूक लढवणारे मंत्री ए. के. ससींद्रन यांचाही काँग्रेसच्या अ‍ॅड. विद्या बालकृष्णन यांच्याकडून पराभव झाला.

## मुंबईतील महत्त्वाकांक्षी मरिना प्रकल्पाचे काम पावसाळ्यानंतर सुरू होण्याची शक्यता

■ मुंबई

**मुंबईतील** व्हिक्टोरिया डॉक येथे मुंबई बंदर प्राधिकरणाच्या (एमबीपीए) वतीने उभारण्यात येणार असलेल्या महत्त्वाकांक्षी मरिना प्रकल्पाचे काम पावसाळ्यानंतर सुरू होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी काही पर्यावरणविषयक परवानग्या मिळणे बाकी आहे.

राज्य स्तरावरील पर्यावरण परिणाम आढावा प्राधिकरणाकडून या पर्यावरणविषयक परवानग्या या महिन्यात मिळणे अपेक्षित आहे. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यापासून प्रकल्पाचे काम सुरू होईल, अशी माहिती एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने दिली.

मरिना प्रकल्पासाठी एकूण पाच कंपन्यांकडून प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. या प्रस्तावांवर सध्या विचारविनिमय सुरू आहे. राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरणाच्या नुकत्याच




झालेल्या बैठकीत या प्रस्तावांवर सखोल चर्चा झाली. या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पासाठी वाढीव क्षेत्रफळाची मागणी एमबीपीएने प्राधिकरणाकडे केली आहे.

## मुंबईसह कोकणात उष्णतेची लाट विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा इशारा

**मुंबईसह ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये आजपासून सलग चार दिवस कोकण किनारपट्टीवर उष्णतेची लाट येणार आहे. त्यामुळे या जिल्ह्यांसाठी हवामान खात्याने खबरदारीचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. तर विदर्भ, मराठवाड्यात विजांचा कडकडाटासह पावसाची शक्यताही हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.**

■ मुंबई

**विदर्भ-मराठवाड्यासह** संपूर्ण महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पारा ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा पार करीत असल्याने



उकाडा वाढला आहे. मुंबईमध्ये कमाल तापमान ३६ अंशांपर्यंत नोंद होत असले तरी हवामानातील आर्द्रतेमुळे कमालीचा उकाडा जाणवत आहे. यातच आज ६, ७, ८ आणि ९ मे रोजी कोकण किनारपट्टीवर उष्णतेची लाट आणि दमट हवामानाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. तर उद्या ७ मे रोजी रायगडमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होण्याचा अंदाजही हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. वातावरणातील बदल पाहता प्रशासनाने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस पडणार असल्यामुळे हवामान खात्याकडून 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. यामध्ये भंडारा, वर्धा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया तर मराठवाड्यात नांदेड, लातूर आणि धाराशीव जिल्ह्यांमध्येही विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याचा अंदाज आहे.

## राज्यात शाळेची फी नियंत्रित करण्यासाठी नव्या समित्या

■ मुंबई

**शैक्षणिक** संस्थांमधील शुल्क नियंत्रण अधिक मजबूत करण्यासाठी राज्य शिक्षण विभागाने राज्यभर विभागीय शुल्क नियामक समित्या स्थापन केल्या आहेत. या समित्या त्यांच्याकडे आलेल्या तक्रारी ऐकतील किंवा तपासणीदरम्यान आढळलेल्या कोणत्याही विसंगतींवर कारवाई करेल. शाळांच्या शुल्क ठरवण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता वाढवण्यासाठीही त्या मदत करतील. यामुळे शाळांच्या मनमानी शुल्क वाढवण्याला चाप बसणार आहे.


सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा


या समित्या महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क नियमन) अधिनियम, २०११ अंतर्गत स्थापन करण्यात आल्या आहेत. शालेय शिक्षण व » पान ७ वर

## इयत्ता सहावीचा नवीन अभ्यासक्रम मंजूर जूनपासून अंमलबजावणीला सुरुवात होणार

■ मुंबई

**महाराष्ट्राच्या** शालेय शिक्षण पद्धतीत मोठा बदल घडवणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. इयत्ता सहावीच्या नवीन अभ्यासक्रम आराखड्याला राज्यस्तरीय सुकाणू समितीने मंजुरी दिली असून, हा अभ्यासक्रम येत्या जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून लागू केला जाणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या अभ्यासक्रमाला अंतिम मंजुरी मिळाली.

हा नवीन अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार केला आहे. या आराखड्यात विद्यार्थ्यांच्या केवळ पाठांतरावर




भर न देता त्यांच्या समजून शिकण्यावर आणि अध्ययन निष्पत्तीवर लक्ष केंद्रित केले आहे. राज्यात यापूर्वीच इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या अभ्यासक्रमात बदल झाले आहेत. त्याच धर्तीवर आता सहावीचा अभ्यासक्रमही पूर्णपणे नव्याने तयार केला आहे. नवीन अभ्यासक्रम मंजूर झाल्यानंतर तो पुढील प्रक्रियेसाठी अभ्यासक्रम समन्वय समितीकडे पाठवण्यात येणार आहे. त्यानंतर पाठ्यपुस्तकांच्या छपाईची जबाबदारी बालभारतीकडे सोपवली आहे. येत्या जूनमध्ये सुरू होणाऱ्या नवीन शैक्षणिक सत्राच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना नवीन पुस्तके उपलब्ध करून देण्याचे नियोजन शिक्षण विभागाने केले आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वार्डबॉय पाहिजेत. पगार (30,000-90,000) **9820628009** {NC260340}

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरीता अनुभवी टेक्निशियन पाहिजेत. चांगला पगार + आकर्षक सुविधा. संपर्क:- **9820683431** {NC260407}

सिक्युरिटी गार्डची भरती ड्युटी 8 तास मुलुंड, वैशाली नगर/ वरळीनाका- **9004883251** {NC260410}

भायखळा / माझगांव विभागात कुरियर डिलिव्हरीसाठी कमिशन / पगारावर मुले पाहिजे. (Daily payment) **7208841538** {NC260413}

सतगुरू इंटरप्राईज कंपनीकरिता विलेपार्ले येथे नामांकित शाळा / कॉलेज मध्ये त्वरित प्यून पाहिजेत. (वयोमर्यादा-४५ वर्षापर्यंत) पत्ता:- 414-E / 4 था माळा, झी-शान, opp. सनसिटी सिनेमा, एम. जी. रोड, विलेपार्ले (पूर्व) Email: satguruenterprise1@gmail.com, **9326007480 / 9820426010** {NC260436}

किमान २ वर्षांचा अनुभव असलेला पुरुष उमेदवार हवा. विरार कार ॲक्सेसरीज शोरूमसाठी संपर्क:- **9834141058** {NC260442}

नवीन न्यूज पेपर मार्केटींग कामासाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे. **9892687313 / 9082356927** {NC260443}

बांद्रा (पूर्व)/ठाणे (माजिवाडा) येथे फ्लॅट साफसफाई कामासाठी मुले / मुली पाहिजेत, सुपरवाईझर पाहिजे. पगार:- 15,000/- सुपरवाईझर :- 20,000/-, **7028463942** {NC260445}

पाहिजेत लॉजमध्ये रूम साफ + इतर किरकोळ कामासाठी मुलगा सकाळी 7 ते 2, रु. 12,000/- + पास भेटा : लक्ष्मी लॉज माटुंगा (पूर्व) मो. **7304554988** {NC260450}

## पाहिजेत

बांद्रा ते भाईंदर विभागाकरिता गॅस मीटर रिडींगसाठी मुले पाहिजेत. per visit 30/- **9820385767** {NC260452}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारी माणसे पाहिजे. पगार- 12,000 + गाडीभाडे + कमिशन. **8356824867** {NC260412}

**ठाणे येथील सुप्रसिद्ध कोल्हापुरी हॉटेलसाठी अनुभवी किचन व सर्विस स्टाफ हवा. संपर्क:- 9869026771** {NC260417}

रबर आणि टीपीई प्रोफाइल उत्पादन युनिटसाठी पुरुष पर्यवेक्षक आणि डिझायनर आवश्यक आहेत. **9022547184** {NC260455}

प्रिंटिंग प्रेससाठी आवश्यकता आहे 1) स्क्रीन प्रिंटिंग ऑपरेटर 2) पंचिंग मशीन ऑपरेटर 3) लॅमिनेशन मशीन ऑपरेटर 4) हेल्पर आणि फ्रेशर 5) ग्राफिक DTP ऑपरेटर. फोकस, 22 (ए)1, हकोबा कंपाऊंड, बॉम्बे कॉटनमिल, काळाचौकी, चिंचपोकळी स्टेशन (पूर्व) आणि कॉटनग्रीन स्टेशन (पश्चिम) येथून 5 मिनिटे चालत. फोन- **9819900505** {NC260456}

10/ 24 तास होम पेशंट ड्युटीसाठी वॉर्डबॉय पाहिजे. चांगला PER DAY. **9372767739 / 8452061740** {NC260458}

मुंबईत हॉटेलमध्ये मोरी, कपडा आणि वेटर पाहिजे राहणे-खाणे मोफत संपर्क:- **9869474850 / 8097558062.** {NC260459}

## पाहिजेत

सिक्युरिटी गार्ड हाऊसकिपिंग डिलिव्हरी बॉय, माळी, प्लंबर लेडीज जेन्टस गोरेगाव, मालाड- **8097507698** {NC260460}

हॉटेलसाठी माळी कामासाठी पुरुष पाहिजे. जैतापूर (राजापूर). 10K + राहण्याची सोय. **9819439898** {NC260461}

## Situation Vacant

Required female Data Entry Operators in Naigaon (West) **9834009073 / 9561632492** {NC260457}

## गुंतवणूकविषयक

फक्त ६ महिन्यात घर, लग्न, कामाच्या (पैशाच्या) समस्या सोडविणारे जीवन विमा गुंतवणूक मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC260344}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3,000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9076403434 / 8652643434** {NC260411}

**-: वाचकांना सूचना :-**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# इथेनॉल मागणीमुळे देशात मका वधारला

■ नवी दिल्ली

**कमी** आवक आणि इथेनॉल उद्योगाकडून वाढती मागणी यामुळे देशात मक्याचे भाव वाढत आहेत, तर राजस्थानातील काही भागांत गव्हाचे दर घसरले आहेत. बाजारातील हंगामी मंदी आणि क्षेत्रनिहाय मागणी हे किमतीतील चढ-उतारामागील प्रमुख कारण असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

कर्नाटकातील दावणगेरे येथे मक्याचे दर प्रति क्विंटल २० रुपयाने वाढून १,७५० ते १,९२० रुपये झाले. कमी आवक आणि इथेनॉल उद्योगाकडून वाढती मागणी यामुळे ही वाढ झाली. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने ई८५ आणि ई१०० सारख्या इंधनांना नियमांत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव मांडल्यानंतर पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण वाढण्याची अपेक्षा आहे.



देश विदेश

# उसाच्या 'एफआरपी'मध्ये क्विंटलमागे १० रुपयांची वाढ

■ नवी दिल्ली

**केंद्र** सरकारने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा केली आहे. सरकारने आगामी २०२६-२७ या हंगामासाठी उसाच्या किमान दरात म्हणजेच एफआरपीत प्रति क्विंटल १० रुपयांची वाढ करून ती ३६५ रुपये प्रति क्विंटल करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात असल्याची माहिती केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, साखर उताऱ्यात प्रत्येकी ०.१ टक्के वाढ झाल्यास एफआरपीमध्ये प्रतिक्विंटल ३.९६ रुपयांनी वाढ होईल. त्यामुळे अधिक साखर उतारा मिळविणाऱ्या कारखान्यांना व शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळणार आहे. जाहीर करण्यात आलेला एफआरपी हा उत्पादन खर्चाच्या सुमारे २००.५ टक्के इतका आहे. या निर्णयामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एक लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# चीनमध्ये फटाका कारखान्यात स्फोट २१ जणांचा मृत्यू! ६१ जखमी

■ हुनान

**मध्य** चीनमधील हुनानच्या लियुयांग परिसरातील फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात २१ जणांचा मृत्यू झाला. ६१ जण गंभीर जखमी झाले. या स्फोटामुळे संपूर्ण परिसर हादरून गेला असून मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाले. स्फोट इतका तीव्र होता की, त्याचा आवाज अनेक किलोमीटरपर्यंत ऐकू आला. आकाशात धुराचे मोठे लोट पसरले व कारखान्याच्या आसपासचा परिसर उद्ध्वस्त झाला. घटनेनंतर स्थानिक प्रशासनाने तत्काळ आपत्कालीन यंत्रणा राबवत मोठ्या प्रमाणावर बचावकार्य सुरू केले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# संयुक्त राष्ट्र निवड प्रक्रियेला वेग महिला नेतृत्वाला चीनचे समर्थन

■ न्यूयॉर्क

**जगातील** सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय संघटनेपैकी असलेल्या संयुक्त राष्ट्राच्या पुढील महासचिव पदासाठी निवड प्रक्रिया सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर चीनने महिला उमेदवाराला पाठिंबा दर्शवला आहे. गेल्या सुमारे ८० वर्षांच्या इतिहासात संयुक्त राष्ट्रांच्या प्रमुखपदी एकाही महिलेला संधी मिळालेली नाही त्यामुळे आता महिला महासचिवाची निवड व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या शर्यतीत सध्या चार प्रमुख उमेदवार आहेत. त्यापैकी दोन महिला उमेदवार विशेष चर्चेत आहेत.

# अमेरिकेचे उडते गॅस स्टेशन कतारच्या आकाशात बेपत्ता

■ कतार

**अमेरिका-इराण** युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे उडते गॅस स्टेशन म्हणून ओळखले जाणारे बोईंग केसी-१३५ स्ट्रॅटोटँकर हे लष्करी विमान कतारच्या आकाशातून अचानक बेपत्ता झाल्याची माहिती आहे. उड्डाणादरम्यान या विमानाने '७७००' हा आपत्कालीन संकेत दिल्यामुळे परिस्थिती गंभीर असल्याचे स्पष्ट झाले.

विमान अल धाफ्रा हवाई तळ येथून उड्डाण करून पर्शियन आखातावरून जात होते. या भागात सध्या युद्ध परिस्थिती असल्याने या उड्डाणाला विशेष महत्त्व होते. मात्र कतारच्या हवाई हद्दीत आल्यानंतर अचानक विमानाचा संपर्क तुटला. फ्लाईट ट्रॅकिंग संकेतांनुसार, संपर्क तुटण्यापूर्वी हे विमान काही वेळ हवेत घिरट्या घालत होते. त्यानंतर त्याची माहिती उपलब्ध राहिली नाही. '७७००' हा संकेत सामान्यतः तांत्रिक बिघाड, वैद्यकीय आपत्कालीन स्थिती किंवा इतर गंभीर अडचणी दर्शवतो.

# महिला बालकल्याण, आरोग्य समिती निवडणूक! बविआ व भाजपाचे अर्ज

**विरार-** वसई-विरार महापालिकेच्या आरोग्य आणि महिला बाल कल्याण समित्यांच्या सभापती आणि उपसभापतींची निवडणूक शुक्रवार ८ मे रोजी संपन्न होणार आहे. या निवडणुकीसाठी बुधवारी बविआ आणि भाजपाने आपापल्या उमेदवारांचे अर्ज सादर केले. वसई-विरार महापालिकेने 'महिला व बालकल्याण' आणि 'आरोग्य' समित्यांचे जाहीर केल्या होत्या. शहराचा वाढता विस्तार आणि गुंतागुंतीच्या समस्या लक्षात घेता, दोन्ही समित्यांची सदस्य संख्या ९ वरून १५ करण्यात आली होती. मात्र या सदस्य निवड प्रक्रियेनंतर या समित्यांचे सभापती आणि उपसभापती पदांच्या निवडणुका रखडल्या होत्या. अखेर कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी येत्या ८ मे रोजी या दोन्ही समित्यांच्या सभापती व उपसभापती पदाच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले होते.

# सत्तेच्या मस्तीत जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका

■ नाशिक

**सिंहस्थ** कुंभमेळ्यासाठी सुमारे ६६ किलोमीटरचा रिंग रोड विकसित केला जात आहे. या प्रकल्पासाठी दरी, मातोरी, मुंगसरे, मखमलाबाद आदी गावांतील जमिनी संपादित केल्या जात आहेत. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असतानाही, दोन दिवसांपूर्वी रात्री अचानक व्हॉट्सॲपवर मोजणीच्या नोटिसा पाठवण्यात आल्या.

काल सकाळी मोजणीसाठी प्रशासनाचा ताफा नियोजित वेळेपूर्वीच मुंगसरे गावात दाखल झाला. यावेळी विरोध करणाऱ्या ग्रामस्थांवर पोलिसांनी जोरजबरदस्ती केली व महिलांनाही मारहाण केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणावरून उबाठाचे नेते अंबादास दानवे यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. 'सत्तेच्या मस्तीत सामान्य जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, ही मस्ती महागात पडेल, असा इशारा त्यांनी दिला.

**अंबादास दानवेंचा इशारा**

अंबादास दानवे म्हणाले, प्रभू रामाच्या या पावन भूमीत माता-भगिनींवर हात टाकून सरकारने आपल्या विनाशाची नांदी लिहू नये! कुंभमेळ्याच्या नावाखाली शेतकरी आणि महिलांना घरात घुसून मारहाण करण्याची मस्ती महागात पडणार. प्रशासकीय बळाचा वापर करून बळीराजाचा आवाज दाबता येईल, या भ्रमात सरकारने राहू नये. संघर्षाची ठिणगी टाकायच्या भानगडीत सरकारने पडू नये.

# पुण्यातील भाजपाच्या दोन नगरसेविकांमधील वाद चिघळला

■ पुणे

**पुण्यात** भाजपाच्या नगरसेविका अर्चना पाटील आणि मृणाल कांबळे यांच्यातील वाद चिघळला आहे. हा संघर्ष आता पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचला आहे. अर्चना पाटील आणि त्यांचे पती तुषार पाटील यांच्याविरोधात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (ॲट्रॉसिटी) अंतर्गत खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही तक्रार मृणाल कांबळे यांचे वडील पांडुरंग उर्फ बापू कांबळे यांनी दिली आहे.

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, महापालिका निवडणुकीपासूनच पाटील आणि कांबळे कुटुंबांमध्ये वाद सुरू होता. प्रचारादरम्यान बॅनर काढणे, कार्यकर्त्यांना धमकावणे आणि विजयानंतरही वाद निर्माण केल्याचे आरोप करण्यात आले आहेत.

# यंदाही अंधेरी सबवे तुंबणार उड्डाणपूल उभारणे अशक्य



■ मुंबई

**अंधेरी** सबवेमधील पाणी तुंबण्याची समस्या सोडवण्यासाठी उड्डाणपूल बांधणे महापालिकेसाठी एक मोठे आव्हान आहे. कारण यासंदर्भात नेमलेल्या सल्लागाराने याठिकाणी उड्डाणपूल उभारणे अशक्य असल्याचे आपल्या अहवालात म्हटले आहे. त्यामुळे यंदाही पावसाळ्यात अंधेरीचा सबवे तुंबण्याची दाट शक्यता आहे.

महापालिकेने अंधेरी सबवेवर उड्डाणपूल उभारणे शक्य आहे की नाही, हे तपासण्यासाठी सल्लागाराची तीन महिन्यांपूर्वी नेमणूक केली आहे. आता सल्लागार कंपनीने आपला अहवाल पालिकेला सादर केला आहे. त्यामध्ये त्या ठिकाणी उड्डाणपूल उभारणे अशक्य असल्याचे नमूद केले. अंधेरी सबवेच्या बाजूने मोगरा नाला जातो.या नाल्याच्या उगमस्थानापासून सबवेपर्यंत १३ मीटरचा उतार असल्याने थोड्याच पावसात पाणी जोरात सबवेमध्ये येते. तसेच, भरतीच्या वेळी मोगरा नाल्याची पातळी वाढूनही सबवे तुंबतो. त्यासाठी गोखले पूल हा पर्याय असूनही तो सबवेपासून ३ किमी दूर असल्याने स्थानिक रहिवाशांना तो सोयीचा वाटत नाही. थोडक्यात उड्डाणपूल बांधणे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीचे असल्याने ते आव्हानात्मक आहे. सल्लागाराच्या या अहवालानंतरच यावर अंतिम निर्णय घेतला जाईल.मात्र एव्हढे नक्की आहे की तूर्तास तरी अंधेरी सबवे पावसाळ्यात तुंबू नये यासाठी पालिकेकडे कोणतेही नियोजन नाही.

# नरखेड तालुक्यात दाम्पत्याची गळफास घेऊन आत्महत्या

■ नागपूर

**आर्थिक** अडचणी आणि नैराश्यातून तरुण पती-पत्नीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना नरखेड तालुक्यातील टाकळघाट येथील सोनाबाई नगरात काल सायंकाळी घडली. मनीष देवराव मारबते (२४) आणि प्रतीक्षा मनीष मारबते (२१) अशी आत्महत्या केलेल्या या दाम्पत्याची नावे आहेत. नरखेड तालुक्यातील खेडीखुर्द येथील हे दाम्पत्य सध्या टाकळघाट येथे वास्तव्यास होते. मनीष आणि प्रतीक्षा यांनी प्रेमविवाह केला होता. त्यानंतर कामाच्या शोधात ते पुणे येथे गेले; मात्र अपेक्षित काम न मिळाल्याने ते दीड वर्षानंतर टाकळघाट येथे मनीषच्या भावाकडे आले. येथे ते शेख कनोजिया यांच्या घरात भाड्याने राहत होते. मनीषने एमआयडीसीतील एका कंपनीत काम सुरू केले होते. परंतु यामुळे आर्थिक ताण वाढला आणि दोघांमध्ये किरकोळ वाद होऊ लागले होते.

# आजचे राशी भविष्य

गुरुवार ता. ७ मे २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| राशी | भविष्य |
| --- | --- |
| मेष | आनंदी व आशावादी राहाल. मनस्थिती निर्णय घेण्यास अनुकूल असेल. कामे वेळेत पूर्ण होतील. |
| वृषभ | प्रवासात खिसापाकीट सांभाळा. नुकसानीचे योग आहेत. कामांना विलंब होईल. |
| मिथुन | प्रगतीकारक दिवस. थोड्या प्रयत्नानेही यश मिळेल. कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळेल. |
| कर्क | उत्साही दिवस. नवी ऊर्जा लाभेल. कामे वेळेत पूर्ण होतील. |
| सिंह | कामाचे दडपण राहील. मनाविरुद्ध खर्च आर्थिक चिंता वाढवेल. जोडीदाराची तब्येत सांभाळा. |
| कन्या | संयम राखल्यास दिवस सुरळीत पार पडेल. थोडीफार दगदग संभवते. भावनातिरेक टाळा. |
| तूळ | पैशाचा ओघ चांगला राहील. उपयोगी खर्च करता येईल. नोकरीत उत्तम कामगिरी होईल. |
| वृश्चिक | पैशाच्या बाबतीत सावध राहा. नुकसानीचे योग आहेत. कामात चुका टाळा. |
| धनु | निष्काळजीपणा कामात चुका संभवतात. लक्षपूर्वक काम करणे महत्त्वाचे राहील. झोपेच्या समस्या सतावतील. |
| मकर | दिवस प्रतिकूल राहील. काटेकोर नियोजन कामाचा ताण कमी करेल. दातदुखीचा त्रास संभवतो. |
| कुंभ | नोकरीत उत्तम कामगिरीचे समाधान लाभेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. जोडीदाराबरोबर आनंदाचे क्षण लाभतील. |
| मीन | पैशाचा ओघ आनंद वाढवेल. कुटुंबासाठी काही खर्च करावा लागेल. कामाचे चीज होईल. |

# लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 18 • सोडत दिनांक 06/05/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **AK-01 : 9679**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) — **9679** — चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **6228** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली / जय जलाराम लॉटरीज् - गोरेगाव

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0354 | 1926 | 2237 | 2265 | 3435 | 3520 | 3584 | 5302 | 6361 | 6478 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0222 | 2311 | 2491 | 3513 | 3855 | 6051 | 6895 | 8333 | 8470 | 9860 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0480 | 3044 | 4185 | 4405 | 5059 | 5193 | 5470 | 6110 | 7980 | 9900 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0438 | 0883 | 1026 | 1216 | 3094 | 5255 | 6916 | 7397 | 8517 | 9786 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

0002 0007 0010 0034 0035 0037 0039 0065 0066 0070 0074 0093 0096 0100 0141 0164 0168 0171 0179 0187 0190 0237 0247 0286 0296 0315 0411 0440 0444 0454 0490 0497 0569 0570 0574
0607 0608 0650 0670 0671 0703 0706 0732 0781 0785 0795 0820 0852 0914 0916 0928 0941 1008 1040 1051 1062 1071 1099 1110 1111 1112 1115 1125 1135 1141 1153 1154 1183 1185 1199
1218 1227 1230 1231 1266 1267 1302 1312 1319 1351 1360 1373 1413 1422 1426 1437 1439 1444 1450 1464 1466 1509 1511 1515 1553 1589 1621 1626 1639 1664 1669 1713 1781 1790 1798 1811 1904 1906 1909 1911
1912 1913 1929 1971 1991 2012 2034 2037 2118 2136 2159 2195 2207 2211 2216 2217 2222 2224 2227 2229 2241 2245 2260 2274 2275 2281 2283 2284 2294 2298 2326 2328 2337 2345 2364 2365 2397 2424 2428 2432
2472 2495 2500 2511 2530 2542 2576 2615 2624 2633 2705 2727 2728 2751 2770 2790 2795 2829 2857 2902 2905 2915 2950 2955 2961 3021 3039 3094 3115 3121 3159 3171 3172 3199 3233 3235 3302 3306 3318 3320
3322 3330 3366 3370 3372 3373 3405 3424 3431 3485 3495 3531 3535 3536 3582 3583 3585 3597 3599 3617 3655 3666 3670 3703 3720 3724 3735 3737 3742 3743 3758 3775 3784 3786 3794 3815 3821 3913 3937 3983
3997 4042 4043 4141 4143 4154 4157 4197 4210 4245 4294 4326 4340 4374 4381 4394 4412 4414 4416 4424 4432 4438 4440 4446 4449 4455 4467 4468 4474 4484 4486 4489 4495 4512 4533 4542 4598 4659 4680 4734
4744 4746 4751 4783 4834 4846 4877 4894 4902 4922 4932 4936 4956 4990 5053 5059 5101 5118 5119 5121 5136 5152 5165 5175 5190 5241 5245 5251 5263 5316 5325 5341 5355 5383 5391 5410 5430 5451 5466 5476
5482 5535 5561 5564 5565 5568 5575 5579 5619 5666 5675 5680 5682 5692 5706 5710 5755 5757 5797 5818 5839 5865 5886 5909 5970 5976 5984 5996 6015 6017 6025 6036 6076 6077 6103 6114 6131 6161 6180 6212
6225 6271 6286 6318 6328 6365 6387 6461 6501 6516 6517 6566 6603 6607 6614 6621 6622 6628 6630 6642 6644 6656 6662 6666 6668 6678 6686 6689 6707 6716 6796 6808 6826 6849 6869 6877 6906 6907 6926 7012
7043 7047 7067 7094 7097 7103 7105 7136 7152 7155 7157 7176 7191 7254 7271 7278 7284 7297 7299 7307 7317 7365 7377 7390 7392 7437 7459 7462 7478 7479 7509 7532 7537 7543 7555 7604 7627 7643 7647 7648
7651 7677 7697 7701 7704 7708 7717 7728 7733 7738 7747 7766 7771 7780 7801 7828 7857 7869 7872 7873 7879 7886 7931 7941 7944 7945 7952 7973 8032 8058 8084 8085 8088 8153 8178 8189 8277 8280 8325 8347
8350 8391 8396 8418 8487 8492 8493 8582 8586 8628 8690 8691 8725 8758 8766 8776 8777 8782 8793 8800 8803 8804 8806 8811 8830 8831 8837 8853 8861 8875 8878 8908 8938 8989 8990 9028 9078 9097 9161 9196
9210 9231 9273 9290 9291 9340 9349 9490 9491 9497 9531 9539 9561 9568 9585 9589 9598 9599 9660 9681 9697 9733 9734 9739 9794 9796 9810 9826 9834 9866 9892 9900 9911 9923 9936 9940 9953 9977 9996 9997

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

निकाल • सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 18 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 06/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-01 : 1395**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **6049** — श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **5670** — सिराज एन्टरप्रायझेस, नागपूर

| बक्षिस | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0095 | 1990 | 2672 | 2956 | 2964 | 3966 | 4569 | 5433 | 6858 | 8726 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0299 | 0372 | 1412 | 2973 | 4363 | 4689 | 6103 | 6416 | 7583 | 8652 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1397 | 1876 | 3955 | 4529 | 4774 | 5308 | 5697 | 6693 | 8685 | 8863 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

0000 0049 0051 0055 0062 0084 0100 0110 0120 0128 0140 0186 0202 0411 0428 0476 0565 0570
0599 0653 0707 0843 0856 0945 0970 0990 1075 1119 1150 1189 1401 1434 1513 1618 1641 1729
1744 1819 1836 2212 2216 2264 2320 2324 2357 2362 2372 2376 2440 2493 2526 2529 2568 2571 2597 2828 2861
2908 2916 2980 3031 3060 3156 3169 3181 3185 3334 3347 3387 3391 3397 3432 3473 3486 3491 3540 3603 3610
3628 3630 3633 3659 3683 3743 3760 3778 3788 3812 3832 3927 3963 3980 3992 4042 4046 4049 4054 4178 4244
4355 4398 4431 4462 4468 4476 4479 4857 4894 4898 4927 4996 5035 5188 5241 5423 5452 5472 5500 5546 5553
5572 5573 5658 5687 5695 5715 5765 5903 5910 5917 5965 5980 6006 6069 6135 6146 6161 6236 6246 6267 6338
6344 6380 6396 6416 6535 6580 6618 6640 6646 6666 6669 6683 6694 6864 6961 6975 7005 7025 7052 7097 7233
7271 7290 7355 7372 7514 7625 7627 7648 7703 7729 7771 7817 7908 7937 7944 7969 7970 8028 8091 8133 8147
8204 8254 8286 8287 8289 8389 8458 8477 8505 8506 8736 8788 8810 8819 8831 8890 8893 8897 9036 9099 9120
9149 9164 9215 9217 9235 9351 9371 9377 9392 9394 9429 9576 9603 9619 9660 9726 9909 9929 9934 9980 9985

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी •

निकाल • महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 18 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 06/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SV-03 : 8926**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0926 | 1057 | 1777 | 4297 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 4668 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 5350 | 5809 | 6492 | 7082 | 7263 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0300 | 1311 | 2833 | 3747 | 3801 | 4444 | 4571 | 5561 | 8953 | 9154 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2431 | 5423 | 5515 | 5560 | 5631 | 5728 | 7831 | 8348 | 8587 | 9594 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

0048 0075 0313 0401 0520 0668 0740 0950 0970 1130 1207
1311 1344 1402 1408 1418 1601 1715 1849 1951 1977 1999 2072 2210
2452 2502 2633 2695 2888 2971 3014 3139 3237 3307 3320 3350 3526
3559 3718 3724 3807 3929 3947 3971 4009 4054 4346 4427 4449 4494
4602 4760 4996 5007 5015 5155 5205 5231 5258 5286 5352 5515 5522
5555 5583 5630 5727 5831 5952 6063 6135 6175 6272 6382 6387 6484
6486 6563 6660 6690 6756 6798 7015 7075 7140 7403 7409 7491 7526
7677 7705 7783 7790 7906 8004 8085 8386 8508 8548 8556 8648 8668
8777 8784 8799 8879 8984 9006 9069 9097 9497 9527 9794 9939 9964

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी ता.७/५/२०२६

| | | |
| --- | --- | --- |
| ८ | ० | ५ |
| ८१ | ०१ | ५१ |
| ८६ | ०६ | ५६ |
| १३४ | १४५ | १५९ |
| २७९ | ३८९ | २४९ |

# बीडमध्ये दुचाकी-कंटेनरची धडक! महिलेचा जागीच मृत्यू

■ बीड

**बीड** शहरात दुचाकी आणि कंटेनरची धडक झाल्याने लग्नाच्या खरेदीसाठी बाजारपेठेत आलेल्या प्रतिभा चौधरी या महिलेचा मृत्यू झाला.

प्रतिभा चौधरी या सुभाष रोड परिसरात खरेदीसाठी जात होत्या. त्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकात आल्यावर त्यांच्या दुचाकीची व एका कंटेनरची धडक झाली. त्यांची चाकी थेट कंटेनरच्या चाकाखाली आली. या भीषण अपघातात प्रतिभा चौधरी यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. संतप्त नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत कंटेनर चालकाला पकडून त्याला मारहाण करत पोलिसांच्या ताब्यात दिले.

**कंटेनर चालक पोलिसांच्या ताब्यात**

## महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

निकाल • महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 18 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 06/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-00 : 2147**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0536 | 1586 | 1990 | 2322 | 3452 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 3636 (महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर) | 4021 (प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण) | 4058 (अंबिका एजन्सी, दादर, मुंबई) | 6710 | 7678 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0418 | 1077 | 3360 | 3991 | 4292 | 4405 | 5448 | 6192 | 8060 | 9279 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0029 | 0400 | 0761 | 1163 | 1796 | 5592 | 7049 | 8210 | 9478 | 9893 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0198 | 2468 | 2508 | 3386 | 4152 | 4679 | 7656 | 8094 | 9128 | 9970 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

0002 0008 0019 0038 0050 0109 0174 0189 0206 0365 0405 0425 0443 0455 0479 0484 0505 0530 0590 0603
0777 0879 0902 0904 0994 1001 1032 1092 1097 1124 1126 1176 1201 1214 1247 1310 1337 1345 1351 1368
1374 1485 1490 1496 1510 1520 1527 1562 1583 1603 1612 1617 1654 1685 1713 1778 1804 1819 1891 1991 2082 2224
2229 2275 2289 2427 2547 2555 2668 2677 2692 2696 2802 2805 2910 2930 2992 3053 3118 3127 3289 3304 3306 3366
3431 3475 3495 3573 3587 3739 3743 3747 3803 3877 3879 3949 4013 4014 4045 4064 4065 4080 4085 4130 4142 4144
4174 4242 4278 4282 4314 4388 4389 4405 4407 4409 4415 4435 4542 4665 4740 4836 4894 4924 4948 5025 5052 5074
5081 5096 5166 5172 5176 5275 5294 5319 5365 5366 5367 5432 5440 5452 5497 5633 5655 5658 5678 5702 5793 5835
5857 5909 5952 5979 6256 6264 6284 6293 6296 6308 6329 6334 6531 6546 6584 6603 6628 6638 6694 6781 6862 6896
6982 6995 7023 7079 7148 7149 7160 7177 7247 7273 7334 7337 7470 7488 7507 7656 7661 7662 7688 7694 7717 7727
7729 7735 7778 7921 7937 7957 7978 8022 8069 8088 8139 8153 8188 8235 8261 8274 8280 8285 8318 8328 8377 8397
8438 8565 8568 8576 8602 8622 8722 8741 8801 8880 8881 8884 8896 8965 9029 9042 9056 9059 9097 9099 9129 9135
9309 9399 9423 9445 9470 9492 9509 9560 9567 9569 9605 9681 9702 9846 9858 9896 9898 9950 9958 9961 9963 9992

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# उबाठाच्या जिल्हाप्रमुखाला हटवताच परभणीतील पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

परभणी

**परभणी** उबाठाला मोठा धक्का बसला असून ८२ पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे दिले आहेत. माजी जिल्हाप्रमुख गंगाप्रसाद आनेराव यांना पदावरून हटवल्याच्या निषेधार्थ हा निर्णय घेण्यात आला आहे.

गंगाप्रसाद आनेराव हे खासदार संजय जाधव यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. ते शिवसेना भवन येथे २५ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीला गैरहजर राहिल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. या बैठकीला खासदार संजय जाधव आणि त्यांचे काही समर्थकही अनुपस्थित होते.


आनेराव यांच्या समर्थनार्थ ८२ पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे सादर करत नाराजी व्यक्त केली आहे. तसेच येत्या आठ दिवसांत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हा निर्णय मागे घेतला नाही, तर सदस्यत्वाचाही राजीनामा देण्याचा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. या घडामोडींमुळे परभणी जिल्ह्याच्या राजकारणात खळबळ उडाली असून पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'मासुंदा' ओसंडून वाहणार नाही अतिरिक्त पाणी नाल्यात सोडणार

**पालिकेचे उपायुक्त गोवेपुरे यांची माहिती**

ठाणे

**यंदाच्या** पावसाळ्यात ठाण्यातील ऐतिहासिक मासुंदा तलाव ओव्हरफ्लो होणार नाही. कारण यंदा ज्या पद्धतीने धरणातील अतिरिक्त पाणी ओव्हरफ्लो होत असताना सोडून दिले जाते, त्या पद्धतीने मासुंदा तलावातील पाणीदेखील मोटारीच्या माध्यमातून कल्व्हर्टमधून नाल्यात सोडले जाणार आहे, अशी माहिती पालिकेचे उपायुक्त गजानन गोवेपुरे यांनी दिली.



पावसाळ्यातील कामाच्या पार्श्वभूमीवर ठाणे पालिकेचा आपत्कालीन कक्ष सज्ज झाला आहे. मुख्यालयाच्या परिसरात हा कक्ष उभारण्यात आला आहे. त्याठिकाणी मुख्य अधिकारी यांच्यासह दोन शिफ्टमध्ये २० जणांची व टीडीआरएफची टीम सज्ज झाली आहे. मासुंदा तलावातील अतिरिक्त पाणी बाहेर काढण्यासाठी व पावसाळ्यात होणारी तुंबई टाळण्यासाठी २ बाय २ मीटर आकाराचा नवीन नाला/जलवाहिनी बांधण्यात आली आहे. हा नाला पेढ्या मारुती मंदिरापर्यंत आणि तेथून पुढे जफर नाल्यापर्यंत पाणी वाहून नेईल, जेणेकरून तलावाच्या आसपासच्या बाजारपेठेत पाणी शिरू नये. याआधी पावसाळ्यात तलाव तुडुंब भरल्यावर परिसरात पाणी साचत होते. पाणी तुंबण्याचे प्रकार थांबवण्यासाठी नवीन नाला बांधण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता. त्याच नाल्यात आता तलावाचे अतिरिक्त पाणी सोडले जाणार आहे.

# आफरीन हुसेन यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड

भाईंदर

**मिरा**-भाईंदर महापालिकेच्या विरोधी पक्षनेतेपदी काँग्रेसच्या सय्यद आफरीन मुज्जफर हुसेन यांची तर सभागृह नेतेपदी भाजपाचे रवी व्यास यांची नियुक्ती करण्यात आली. बुधवारी पार पडलेल्या महासभेत या निवडीचा ठराव मंजूर करण्यात आला. विशेष म्हणजे ३ महिन्यांनंतर ही निवड जाहीर करण्यात आली. मिरा-भाईंदर महापालिकेत भाजपाने ९५ पैकी ७८ जागा जिंकून सत्ता स्थापन केली होती.

फेब्रुवारी महिन्यात पहिली महासभा पार पडली. विविध समित्यांची स्थापना करण्यात आली होती. काँग्रेस आणि शिवसेनेच्या शहर विकास आघाडीचे १६ नगरसेवक असूनही विरोधी पक्षनेतेपद निवडले नव्हते. दुसरीकडे अंतर्गत वादामुळे भाजपानेही सभागृहनेता निवडला नव्हता. अखेर बुधवारी विरोधीपक्षनेतेपदी काँग्रेसच्या सय्यद आफरीन मुज्जफर हुसेन यांची तर सभागृह नेतेपदी भाजपाचे रवी व्यास यांची नियुक्ती करण्यात आली.

# पुणे शहरात ३१ मेपर्यंत पाणीकपात नाही महापौर मंजुषा नागपुरे यांच्या बैठकीत निर्णय

पुणे

**पुणे** शहरातील नागरिकांना दिलासा देणारा निर्णय घेत पुणे महानगरपालिकेने ३१ मेपर्यंत पाणीकपात न करण्याचे आदेश दिले आहेत. आगामी मान्सूनआधी पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

काही दिवसांपूर्वी जलसंपदा विभागाने शहरात पाणीकपात करण्याबाबत महापालिकेला पत्र दिले होते. यावर अंतिम निर्णय घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत शहरातील विद्यमान पाणीसाठा, जलशुद्धीकरण व्यवस्था, वितरण प्रणाली आणि संभाव्य पाणीटंचाईवर उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पुणे शहराला पानशेत, वरसगाव, टेमघर आणि खडकवासला या चार धरणांमधून पाणीपुरवठा केला जातो. सध्या या धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

मागील दोन-तीन वर्षांच्या तुलनेत यंदाचा साठा अधिक असल्याचेही नमूद करण्यात आले. भारतीय हवामान विभागाने यंदा पावसाचा प्रारंभ उशिरा होण्याची शक्यता वर्तवली असून, त्यानुसार नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाणी गुणवत्तेबाबत पर्वती जलकेंद्र प्रयोगशाळेत दरमहा नमुन्यांची तपासणी केली जाते.

# कोकण रेल्वेची वाहतूक विस्कळीत

मुंबई

**कोकण** रेल्वे मार्गावरील वाहतूक काही तासांसाठी विस्कळीत झाली होती. पनवेलमधील कळंबोली येथे मालगाडीच्या पेंटाग्राफमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे हा प्रकार घडला. या बिघाडामुळे मुंबईकडे येणाऱ्या अनेक गाड्यांवर परिणाम झाला आणि त्या उशिराने धावत होत्या. कोकणातून मुंबईकडे येणाऱ्या प्रवासी तसेच काही मालगाड्यांची वाहतूक काही तास विस्कळीत झाली होती. रेल्वे प्रशासनाने तत्काळ दुरुस्तीचे काम हाती घेतले होते. संबंधित तांत्रिक बिघाड दूर करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर वाहतूक हळूहळू पूर्ववत करण्यात आली. काही काळ गाड्या उशिराने धावत असल्याने प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला.

# करमाळ्यात शेजाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून महिलेची आत्महत्या

**तिघांविरुद्ध गुन्हा दाखल**

सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यातील करमाळा येथील दत्तपेठ परिसरात शेजाऱ्यांकडून होत असलेल्या सततच्या त्रासाला कंटाळून एका विवाहित महिलेने आत्महत्या केली. या प्रकरणी करमाळा पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आशा अर्जुनसिंग परदेशी (३८) असे मृत महिलेचे नाव आहे. पती अर्जुनसिंग परदेशी (५०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे घराशेजारी राहणारे मनिषा शिंगाडे, ओम शिंगाडे आणि समृद्धी शिंगाडे यांच्याशी किरकोळ कारणांवरून वारंवार वाद होत होते. वाहन पार्किंगसारख्या कारणांवरूनही शिवीगाळ, दमदाटी आणि मानसिक त्रास दिला जात असे. या सततच्या वादामुळे आशा परदेशी मानसिकदृष्ट्या खचल्या होत्या. काही दिवसांपूर्वी पुन्हा वाद झाल्यानंतर संबंधितांनी आशा यांना मारहाण केली होती. नातेवाईकांनी मध्यस्थी करून वाद मिटवला होता. मात्र, त्यानंतर काही वेळातच आशा परदेशी यांनी घरातील पॉलिश थिनर अंगावर ओतून स्वतःला पेटवून घेतले. नातेवाईकांनी तत्काळ आग विझवून त्यांना करमाळा येथील रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना साई एशियन हॉस्पिटल येथे हलविण्यात आले. सुमारे ६५ टक्के भाजलेल्या अवस्थेत उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सीबीआयचा त्यांच्याच उपअधीक्षकावर बेहिशोबी मालमत्ता प्रकरणी गुन्हा

मुंबई

**सीबीआयच्या** बँक सिक्युरिटीज अँड फ्रॉड शाखेने मुंबई येथे नियुक्त असलेल्या तत्कालीन उपअधीक्षक ब्रजमोहन मीना यांच्याविरोधात उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्ता प्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.

ब्रजमोहन मीना आणि त्यांच्या एका नातेवाईकावर ९८.६३ लाख रुपयांची मालमत्ता जमा केल्याचा आरोप आहे. ही रक्कम त्यांच्या ज्ञात उत्पन्न स्त्रोतांच्या तुलनेत ८७ अधिक आहे. त्यांनी मध्यस्थ आणि हवाला मार्गे लाच घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे. मीना यांनी २००३ मध्ये उपनिरीक्षक म्हणून सीबीआयमध्ये दाखल झाले. २००९ मध्ये निरीक्षक आणि २०१९ मध्ये त्यांनी उपअधीक्षक पदावर बढती मिळवली.

२७ सप्टेंबर २०२१ ते ३१ डिसेंबर २०१४ या कालावधीतील त्यांच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू आहे. तपास करत असलेल्या विविध व्यक्तींकडून चुकीच्या पद्धतीने लाभ घेतल्याच्या आरोपावरून त्यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बारावीची पुरवणी परीक्षा! अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू

**१५ मेपर्यंत अर्जाची मुदत**

मुंबई

**महाराष्ट्र** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे येत्या जून आणि जुलैमध्ये होणाऱ्या बारावीच्या पुरवणी परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पात्र विद्यार्थी बोर्डाच्या अधिकृत संकेतस्थळावर १५ मेपर्यंत नियमित शुल्कासह अर्ज भरू शकतील.

राज्य मंडळातर्फे बारावीची पुरवणी परीक्षा जून-जुलैमध्ये घेण्यात येणार आहे. परीक्षेसाठी पुनःपरीक्षा, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, जून-जुलैमध्ये नावनोंदणी केलेले खासगी विद्यार्थी, तसेच श्रेणीसुधार योजनेंतर्गत आणि तुरळक विषय घेऊन परीक्षा देणारे, आयटीआय विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरता येणार आहे.

त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज भरून सादर केल्यानंतर अर्ज भरण्याच्या कालावधीमध्ये शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रीलिस्ट उपलब्ध करून दिली जाणार आहे. शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची मुद्रित प्रत घेऊन अर्जात नमूद केलेली माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. पडताळणी केल्याबाबत शाळाप्रमुख, प्राचार्य यांनी प्रीलिस्टच्या प्रत्येक पानावर स्वाक्षरी करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.



# अहिल्यानगर-बीड रेल्वेसेवा १९ मेपर्यंत बंद

अहिल्यानगर

**दुहेरी** मार्गाच्या कामामुळे अहिल्यानगर-बीड रेल्वे मार्गावरील प्रवासी सेवा तात्पुरत्या स्वरूपात रद्द करण्यात आल्या आहेत. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ही सेवा १९ मे २०२६ पर्यंत बंद राहणार आहे. प्रवाशांनी याची नोंद घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अकोळनेर-अहिल्यानगर-निंबळक या सेक्शनदरम्यान सुरू असलेल्या दुहेरी मार्गाच्या कामामुळे ब्लॉक कालावधीत अहिल्यानगर स्थानकावर फक्त अप आणि डाऊन मेन लाईनच रेल्वे वाहतुकीसाठी उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे गाडी क्रमांक ७१४४१ (अहिल्यानगर-बीड) आणि ७१४४२ (बीड-अहिल्यानगर) या दोन्ही गाड्या तात्पुरत्या रद्द करण्यात आल्या आहेत. अहिल्यानगर-बीड रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे आणि इंटरलॉकिंगचे काम वेगाने सुरू आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर प्रवासाचा कालावधी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. सध्या ५ तास लागणारा प्रवास भविष्यात केवळ २ तास ३० मिनिटांत पूर्ण होणार आहे.



# 'शक्ती' कायदा तत्काळ लागू करा खा. वर्षा गायकवाडांचे राज्यपालांना पत्र

मुंबई

**राज्यातील** वाढत्या महिला अत्याचारांच्या घटनांबाबत काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांना पत्र लिहून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. पत्रात त्यांनी नसरापूरसारख्या धक्कादायक घटनांचा उल्लेख करत 'शक्ती' कायदा तात्काळ लागू करावा, गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी आणि त्यांच्यात कायद्याची भीती निर्माण होईल, अशी प्रभावी यंत्रणा उभी करावी, अशी मागणी केली आहे.

वर्षा गायकवाड म्हणाल्या की, महाराष्ट्राची ओळख प्रगत आणि सुरक्षित राज्य अशी होती, पण आज परिस्थिती भीषण आहे. राज्यात महिला आणि चिमुकल्या मुलींवर होणारे अत्याचार पाहून महाराष्ट्राच्या लौकिकाला काळिमा फासला जात आहे. महाविकास आघाडी सरकारने गुन्हेगारांना २१ दिवसांत फाशीची शिक्षा देणारा कठोर 'शक्ती कायदा' मंजूर केला. मात्र, दुर्दैवाने मागील ३ वर्षांपासून हा कायदा केंद्र सरकारकडे धूळ खात पडला आहे. भगिनींना न्याय हवा असेल, तर हा कायदा त्वरित लागू होणे गरजेचे आहे. राज्यपालांनी यासाठी केंद्र सरकारकडे तातडीने पाठपुरावा करावा, यात हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे. ज्या मुंबईला आपण सुरक्षित मानतो, तिथेच महिलांवरील गुन्ह्यांमध्ये १२.८ टक्के वाढ झाली आहे. बलात्कार, विनयभंग आणि पोक्सोच्या घटनांची वाढती संख्या ही राज्यासाठी शरमेची बाब आहे.

# 'लो फिर आ गये' बॅनरची चर्चा दानवेंचा शिंदे-भाजपाला टोला

छत्रपती संभाजीनगर

**'तुमको** क्या लगता था नही लौटेंगे, लो फिर आ गये' असा उल्लेख असलेल्या बॅनरमुळे छत्रपती संभाजीनगरमध्ये राजकीय चर्चांना उधाण आले आहे. हा बॅनर उबाठाचे नेते अंबादास दानवे यांच्या समर्थकांनी लावलेला आहे. या बॅनरवर 'वादळातही ठाम उभा, बाळासाहेबांचा निष्ठावंत शिवसैनिक' असा उल्लेखही करण्यात आला आहे. या बॅनरच्या माध्यमातून शिंदे गट आणि भाजपाला खोचक टोला लगावला आहे.

विधान परिषद निवडणुकीत उबाठाकडून दानवे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आज संभाजीनगरमध्ये भव्य रॅली काढून त्यांचे स्वागत करण्यात आले.




याच दरम्यान क्रांती चौकात लावण्यात आलेल्या बॅनरने सर्वांचे लक्ष वेधले.

# जालन्यात लव्ह जिहाद? ४ आरोपींवर गुन्हा दाखल

जालना

**जालना** जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील वालसावंगी गावात एका मुलीवर अनेक वर्षे अत्याचार, ब्लॅकमेलिंग आणि धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा आरोप आहे. या प्रकरणामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पारध पोलीस ठाण्यात मुख्य आरोपी शेख इम्रान शेख हबीब, त्याचे आई-वडील यांच्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, हा प्रकार २०१६ पासून सुरू झाला. त्यावेळी ती अल्पवयीन होती. आरोपीने तिचे अंघोळ करतानाचे आक्षेपार्ह फोटो काढून त्याचा वापर ब्लॅकमेलिंगसाठी केला. हे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर वारंवार दबाव टाकला. आरोपीने वालसावंगी, जालना आणि छत्रपती संभाजीनगर परिसरात तिच्यावर वारंवार शारीरिक अत्याचार केले. बदनामी भीतीमुळे ती अनेक वर्षे गप्प होती.

# आठव्या मजल्यावरून पडून मजूर महिलेचा मृत्यू

नालासोपारा

**बांधकाम** सुरू असलेल्या इमारतीच्या ८ व्या मजल्यावरून पडून मजूर महिलेचा मृत्यू झाला. नालासोपारा पूर्वेच्या आचोळे येथे ही दुर्घटना घडली. नालासोपारा पूर्वेकडील आचोळे येथे 'श्वेतगंगा कन्स्ट्रक्शन' या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. कविता साहू (२८) ही महिला या ठिकाणी आपले वडील आणि पती मिथुन साहू यांच्यासोबत मजुरीचे काम करत होती. आज दुपारी एकच्या सुमारास कविता आठव्या मजल्यावरील गॅलरीमध्ये बांधकामासाठी लागणारे सिमेंट ब्लॉक देण्याचे काम करत असताना अचानक तिचा तोल गेला आणि ती गॅलरीतून थेट खाली पडली. गंभीर जखमी झालेल्या कविताला तात्काळ विजयनगर येथील महापालिका रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

# राज्यात टोल नाक्यांवर सरकार कृषी मॉल उभारणार

मुंबई

**राज्यातील** शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाची थेट विक्री करता यावी यासाठी राज्यातील प्रत्येक टोल नाक्यावर कृषी मॉल उभारण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे.



या उपक्रमामुळे शेतकरी आपला शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवू शकणार आहेत. शेतातून थेट टोल नाक्यावर विक्रीची सुविधा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांचा वेळ, वाहतूक खर्च आणि श्रम मोठ्या प्रमाणात वाचणार आहेत. मध्यस्थांची गरज कमी झाल्याने शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्याची शक्यताही वाढणार आहे. प्रवाशांना या टोल नाक्यांवरील कृषी मॉलमधून ताजा भाजीपाला आणि इतर शेतमाल सहज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ग्राहकांनाही बाजारपेक्षाही ताजा आणि तुलनेने स्वस्त माल मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

शेताच्या जवळच विक्री केंद्र उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रत्येक टोल नाक्यावर या कृषी मॉलची उभारणी करण्यात येणार आहे. यापूर्वी राज्य सरकारने शहरांमध्ये आठवडी बाजार सुरू करून शेतकऱ्यांसाठी पर्यायी बाजारपेठ निर्माण केली होती. त्यानंतर आता टोल नाक्यांवर कृषी मॉल उभारण्याचा निर्णय घेतल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

# राजीनामा न देणे हा ममतांच्या आंदोलनाचा एक भाग आहे

**खा. संजय राऊत यांची भूमिका**

मुंबई

**विधानसभा** निवडणुकीत पराभूत झाल्यानंतरही मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा न देणाऱ्या ममता बॅनर्जी यांची शिवसेना उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी पाठराखण केली. ते राऊत म्हणाले की, ममतांनी घेतलेल्या भूमिकेला आमचा पाठिंबा आहे.

त्यांनी राजीनामा देण्यास नकार देणे हा त्यांच्या आंदोलनाचाच एक भाग आहे. राऊत पुढे म्हणाले की, प.बंगालच्या निवडणुकीत मोदी आणि शहा यांनी अक्षरशः कहर केला. आर्थिक दहशतवाद, मुस्कटदाबी, लाखो मतदारांची नावे गायब करणे, निवडणूक आयोगाचा पुरेपूर वापर करून घेणे अशा सर्व मार्गांचा यथेच्छ वापर मोदी आणि शहांनी बंगालच्या निवडणुकीत केला. केंद्रीय सुरक्षा दलांच्या फौजा कोलकातामध्ये उतरवल्या. जणू काही इराण-अमेरिका युद्ध सुरू आहे, अशी अवस्था पश्चिम बंगालची झाली होती. ममता बॅनर्जी जे काल म्हणाल्या ते योग्यच आहे. त्या ही निवडणूक हरलेल्या नाहीत. त्यांना हरवण्यात आले आहे. दडपशाही मार्गाने संपूर्ण निवडणूक मोदी आणि शहांनी आपल्या हाती घेतली होती. त्यामुळे आपल्या सोयीचे निकाल त्यांना लावता आले. याला लोकमताचा कौल असे म्हणताच येणार नाही. ममता बॅनर्जी यांच्या पराभवाचा इंडिया आघाडीतील काही घटक पक्षांना आनंद झाला, हे खरे आहे का, असे विचारले असता संपूर्ण इंडिया आघाडी एकजुटीने ममता बॅनर्जी यांच्या पाठीशी उभी आहे.

# झेडपी शाळांमध्ये खासगी परीक्षांना बंदी! पहिल्याच बैठकीत मोठा निर्णय

**विद्यार्थ्यांवर अतिरिक्त परीक्षांचा ताण कमी**

पुणे

**पुणे** जिल्हा परिषदेच्या नव्या कार्यकाळातील प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात झाली असून विविध समित्यांच्या बैठकींचे सत्र सुरू झाले आहे. शिक्षण व क्रीडा समितीच्या पहिल्याच बैठकीत शिक्षण क्षेत्राशी संबंधित एक धाडसी आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शासन किंवा जिल्हा परिषद आयोजित परीक्षांव्यतिरिक्त इतर कोणत्याही खासगी संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या बाह्य परीक्षांना पूर्णतः बंदी घालण्याचा ठराव समितीने मंजूर केला.

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांवर लादल्या जाणाऱ्या अतिरिक्त परीक्षांचा ताण कमी होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. तसेच शैक्षणिक प्रक्रियेत अधिक शिस्त आणि एकसंघता येणार असल्याचेही सांगण्यात आले. या महत्त्वपूर्ण बैठकीत नवनिर्वाचित सदस्यांनी मॉडेल स्कूल योजनेच्या अंमलबजावणीवरून प्रशासनाला धारेवर धरले. जिल्ह्यातील ३०३ मॉडेल शाळांचा सविस्तर आढावा घेऊन पुढील आठवड्यात प्रत्यक्ष पाहणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

याशिवाय, शिक्षक संवर्गातील पदोन्नती आणि रिक्त पदांचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देशही देण्यात आले. शिक्षण व क्रीडा समितीची ही बैठक उपाध्यक्ष विवेक वळसे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी बोलताना वळसे-पाटील यांनी सांगितले की, शहरालगतच्या गावांमध्ये वाढती लोकसंख्या, औद्योगिक वसाहतींमुळे वाढलेले स्थलांतरित कामगार, तसेच विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी दूरवर जावे लागणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन शाळांचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# छत्रपती संभाजीनगरात शेततळ्यात पडून ६ वर्षीय चिमुकलीचा मृत्यू

छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर जिल्ह्यातील पळशी शिवारात शेततळ्यात पडून अवघ्या सहा वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत मुलीचे नाव तनुजा रवी राठोड असे आहे. ती आपल्या कुटुंबासोबत पळशी शिवारात राहत होती. प्राथमिक माहितीनुसार, खेळता खेळता तोल जाऊन ती शेततळ्यात पडल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक रहिवासी ज्ञानेश्वर पळसकर यांनी अग्निशमन दलाला कळवले. त्यानंतर अग्निशमन दलाचे पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने काही वेळातच चिमुकलीला पाण्यातून बाहेर काढण्यात आले. तिला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले.

# धारूरमध्ये शेतकऱ्याचे अपहरण चार अज्ञातांविरोधात गुन्हा

बीड

**बीडच्या** धारूर तालुक्यातील मैंदवाडी येथे दिवसाढवळ्या एका शेतकऱ्याचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी त्यांच्या पत्नी सिमिनता यांच्या तक्रारीवरून चार अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिमिनता दिनकर मैंद (४०) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ४ मे रोजी दुपारी सुमारे १२.५० वाजता त्या घरी असताना त्यांच्या पुतण्याचा फोन आला. त्याने दिनकर मैंद हे धारूर येथील कृषी सेवा केंद्राजवळ असताना चार अज्ञात व्यक्तींनी जबरदस्तीने गाडीत टाकून त्यांचे अपहरण केल्याची माहिती दिली. दिनकर मैंद हे ऊसतोड मजूर म्हणून बाजारासाठी धारूर येथे आले होते. त्यानंतर ते बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे. या प्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. या घटनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा साखर कारखानदार रमेश आडसकर यांची एक ऑडिओ क्लिपदेखील व्हायरल झाली आहे. या क्लिपमध्ये दिनकर मैंद यांच्या सुटकेसाठी पैशांची मागणी केल्याचा दावा केला जात आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# अस्थिरतेसाठीच ही राजकीय अराजकता

**निवडणुकांच्या** रणधुमाळीचा धुराळा शांत होण्यापूर्वीच पश्चिम बंगालमध्ये पंजाबमध्ये घडलेल्या हिंसाचाराची घटना म्हणजे पुन्हा देशाला अस्थिर करण्याचे षड्यंत्र ठरते. पश्चिम बंगालमध्ये यावेळी पहिल्यांदाच कोणताही मोठा हिंसाचार न घडता निवडणुका पार पडल्या. तिथल्या धक्कादायक निकालानंतर मोठ्या प्रमाणावर राजकीय चलबिचलही मोठ्या प्रमाणावर व्यक्त होते आहे. पराभव असो किंवा विजय असो. या दोन्ही परिस्थितीत लोकशाही व्यवस्थेची प्रतिष्ठा कायम ठेवण्याची जबाबदारी प्रामुख्याने राजकीय पक्षांवरच येते. परंतु तीच पाळली जात नसल्याने निवडणुकांच्या काळात किंवा निवडणुकांनंतर कुठे ना कुठे, काही ना काही प्रमाणात हिंसाचार घडून येतो. पश्चिम बंगालमध्ये दोन भाजपा कार्यकर्त्यांचा झालेला मृत्यू ही निवडणुकीनंतरच्या अस्थिर राजकीय परिस्थितीचा मोठा परिणाम म्हणावा लागेल. अशा प्रकारच्या हिंसाचाराची शक्यता लक्षात घेऊनच निवडणुकीनंतर केंद्रीय पोलीस दल तिथे पंधरा दिवस कायम राहील, असे केंद्रीय गृहमंत्र्यांनी जाहीर केले होते. तरीदेखील जर हिंसाचार घडून येत असेल तर तिथली राजकीय अस्थिरता किती गंभीर स्वरूपाची आहे यावर प्रकाश पडतो. पुढच्या वर्षभरात उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, या ठिकाणी विधानसभा निवडणुकांची धामधूम सुरू होईल. परंतु पंजाबमध्ये सुरू झालेला हा निवडणूकपूर्व हिंसाचार अशाच प्रकारे राजकीय अस्थिरतेचा धोकादायक भाग ठरतो. गेल्या महिनाभरात पंजाबमध्ये तीन स्फोट घडून आलेले आहेत. २७ एप्रिलला रेल्वे ट्रॅकवर झालेला स्फोट आणि आता अमृतसरच्या आर्मी कँटोन्मेंटच्या बाहेर एका स्कूटरमध्ये झालेला स्फोट, तर जालंधर येथे बॉर्डर सिक्युरिटी फोर्सच्या मुख्यालयाच्याबाहेर झालेला स्फोट या दोन्ही घटना केवळ पंजाबच नव्हे तर राष्ट्रीय स्तरावरच्या धोक्याचा इशारा म्हणता येऊ शकतो. पंजाबमधल्या स्फोटाची जबाबदारी खलिस्तान्यांनी घेतली आहे. याचा अर्थ पुन्हा एकदा खलिस्तानी दहशतवादी पंजाबमध्ये कार्यरत झालेले दिसतात. गेल्या वर्षभरात अशा प्रकारच्या बारीक बारीक स्फोटाच्या आणखी दोन घटना घडल्या. पुढच्या वर्षी होणाऱ्या निवडणुकीपूर्वी दहशत निर्माण करण्यासाठीच हे प्रकार सुरू झालेले दिसतात.

**देशविरोधी गटांचे नेटवर्क**

भारत हा विविध जाती, पंथ, संप्रदायांचा देश मानला जातो. परंतु या विशिष्ट जाती संप्रदायांच्या भावनांचा केव्हा आणि कसा उद्रेक होईल हे कधीही सांगता येत नाही. बऱ्याच वेळेला राष्ट्रविरोधी शक्ती त्या गटांचा गैरवापरही करून घेतात. कारण त्यांना देशामध्ये सतत अस्थिरता खदखदत ठेवायची असते. कोणत्याही असंतोषाचे कारण अशा राष्ट्रविरोधी शक्तींना पुरेसे ठरते. जात, पंथ, धर्माच्या नावावर भावना भडकवणे खूप सोपे जाते. आणि आजच्या सोशल मीडियाच्या काळात तर अफवा किंवा चुकीची खोटी माहिती पसरवून कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण करणे सोपे झाले आहे. ज्या पंजाबमध्ये इंदिरा गांधी पंतप्रधान असताना खलिस्तानवाद्यांची चळवळ एका प्रचंड टोकाला जाऊन पोहचली होती. संपूर्ण सुवर्णमंदिर आपल्या ताब्यात घेऊन सरकारपुढे वाटेल त्या मागण्या ठेवल्या जात होत्या. स्वतंत्र खलिस्तानची मागणी करून देश तोडण्याचा आणि एक धक्कादायक अराजक निर्माण करण्याचा प्रयत्न झाला होता. त्याला बाहेरच्या भारतविरोधी शक्तीनेदेखील खूप मदत केली होती. इंदिरा गांधींनी त्यावेळी खूप मोठी जोखीम स्वीकारून सुवर्ण मंदिरात लपलेल्या खलिस्तान्यांना वेचून वेचून ठार केले होते आणि मंदिराचे पावित्र्यही कायम ठेवले होते. परंतु त्यांच्या या धाडसी कारवाईचे तितकेच मोठे नुकसान देशाला सहन करावे लागले. इंदिरा गांधींना त्यांच्याच अंगरक्षकांनी त्यांची केलेली हत्या ते देशाला एका मोठ्या अराजकतेत ढकलण्याचा आंतरराष्ट्रीय कट होता. तोच पंजाब गेल्या पस्तीस वर्षांत स्थिर आणि शांत करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. मात्र गेल्या तीन-चार वर्षांत तिथली परिस्थिती बदलली. आणि परदेशात राहून विशेषतः कॅनडातल्या खलिस्तानीवादी गटांनी पुन्हा एकदा जोर धरला. परदेशात भारतविरोधी निदर्शने करण्यापासून ते आता पंजाबमध्ये अशा प्रकारच्या घटना घडवून आणण्यापर्यंत त्यांचे उपद्व्याप सुरू झालेले आहेत. अर्थात तीस वर्षांपूर्वीची परिस्थिती आणि आताची परिस्थिती यात बराच फरक पडलेला आहे.

**येणाऱ्या वर्षाचे धोके**

पश्चिम बंगाल आणि पंजाबमधल्या ताज्या घटनांची अत्यंत गांभीर्याने दखल घेतली गेली पाहिजे. अशाच प्रकारच्या प्रवृत्ती देशाच्या विविध भागांतही दबा धरून बसलेल्या आहेत. आज जरी दहशतवादी घटनांचे प्रमाण कमी झालेले दिसत असले तरी या देशविरोधी प्रवृत्तींचे नेटवर्क कायम असल्याचे म्हणावे लागते. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये दिल्लीत झालेला कार बॉम्बस्फोट आणि त्यात उच्चशिक्षित चार डॉक्टरांचा असलेला समावेश या प्रकारातून देशविरोधी प्रवृत्तींचे नेटवर्क कार्यरत असल्याचेच स्पष्ट झाले होते. पंजाबमध्ये पुढच्या वर्षी होणाऱ्या निवडणुका पश्चिम बंगालप्रमाणेच शांततेत व्हायच्या असतील तर तिथेसुद्धा आतापासूनच पूर्वतयारी सुरू करावी लागेल. पश्चिम बंगालमध्ये निवडणूक काळात होणाऱ्या संभाव्य हिंसाचाराची दखल घेऊनच उपाययोजना केल्या गेल्या होत्या. तशाच प्रकारची सावधगिरी पंजाबबाबत घ्यावी लागेल. कुठेतरी पुन्हा एकदा देशभरात अस्थिरता निर्माण करायची, दहशत निर्माण करून आपले उद्दिष्ट साध्य करायचे असे षड्यंत्र सुरू झालेले दिसून येते. त्यासाठीच ही राजकीय अराजकता निर्माण करण्याचा हेतूही स्पष्ट होतो. देशाचे दुर्दैव एवढेच आहे की, या सगळ्या विविधतेला उत्तम सामाजिक स्थिरता देण्यासाठी सर्वोत्तम अशा संविधानाची निर्मिती केली गेली. परंतु त्या संविधानाच्या तरतुदींनाही जुमानायचे नाही आणि स्वतःची स्वतंत्र राजकीय किंवा सांप्रदायिक किंवा धार्मिक दहशत निर्माण करायची असे प्रकार घडून येत असतात. आणि इथेच केंद्र किंवा त्या त्या राज्य सरकारांची मोठी कसोटी लागते. येणारे वर्ष हे याच कसोटीशी संघर्ष करणारे वर्ष ठरू शकते.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

वाघ भुकेला असला तरी गवत खात नाही. कारण त्याला त्याची ओळख माहीत असते. तसेच परिस्थिती कशीही असो, स्वतःची किंमत कधीच कमी होऊ द्यायची नसते.

## पंचांग

**गुरुवार, ७ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



* वैशाख कृष्ण पंचमी
* नक्षत्र : पूर्वाषाढा
-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० धनु

रवी उदय- ०६-०९
रवी अस्त- १९-०२

**संत चोखोबा महाराज पुण्यतिथी**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### व्हेज कोफ्ता करी



★**साहित्य :-** ५ सर्व्हिंग्ज
१ छोटा कोबी, ३-४ गाजर, १/२ वाटी हिरवा वाटाणा, ३-४ हिरव्या मिरच्या, २ टेबलस्पून डाळीचे पीठ, १ टेबलस्पून तांदळाचे पीठ, १ टीस्पून कसुरी मेथी, १ टीस्पून जिरे, १ टेबलस्पून लाल तिखट, १ टीस्पून किचन किंग मसाला, १ टीस्पून मिरे पावडर, १ टीस्पून गरम मसाला, २ मोठे कांदे, १ टोमॅटो, ३-४ लसूण पाकळ्या, १ टेबलस्पून मगज बी, आवश्यकतेनुसार तेल, मोहरी, हिंग, लाल मिरच्या तडक्यासाठी,


★**साहित्य :-** ४५ मिनिटे
प्रथम कोबी, गाजर किसून घ्या. वाटाणा वाफवून घ्या. एका बाऊलमध्ये या सर्व भाज्या घेऊन त्यात डाळीचे, तांदळाचे पीठ, मीठ, वाटलेली मिरची, थोडेसे लाल तिखट, मिरे पावडर, कसुरी मेथी घालून मिश्रण एकजीव करून झाकून बाजूला ठेवा.

**ग्रेव्हीसाठी**

कढईमध्ये तेल घाला. त्यात कांदे, मगज बी, टोमॅटो, लसूण पाकळ्या, कसुरी मेथी, जिरे घालून चांगले परतून थोडे पाणी घालून शिजवून घ्या आणि थंड झाले की, मिक्सरला वाटून ग्रेव्ही करून घ्या.

आता कढईमध्ये तेल घेऊन वरील ग्रेव्ही घाला. त्यात लाल तिखट, किचन किंग मसाला, गरम मसाला घाला. थोडे दही घालून तेल सुटेपर्यंत शिजवा. आता गरम पाणी घाला आणि मीठ घालून ग्रेव्हीला उकळी येऊ द्या.

दुसऱ्या बाजूला कोफ्ते तळून घ्या. आणि ग्रेव्हीमध्ये घाला. तडका पॅनमध्ये तेल घेऊन मोहरी, हिंग, मिरच्या तडतडून ग्रेव्हीवर घालून झाकून ठेवा. मस्त अशी व्हेज कोफ्ता करी तयार आहे.




# पंजाब किंग्स संघाला ३३ धावांनी नमवून हैदराबादने अव्वल स्थान गाठले



**हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या ४९ व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने पंजाब किंग्सला ३३ धावांनी नमवले. या सातव्या विजयासह हैदराबादने गुणतालिकेत १४ गुणांसह पंजाबला खाली खेचत अव्वल स्थानावर कब्जा केला. या सामन्यात इशान किशनच्या ५५ आणि हेनरिक क्लासेनच्या ६९ धावांच्या बळावर हैदराबादने पंजाबला विजयासाठी २३५ धावांचे मोठे आव्हान दिले होते. मात्र ते पंजाबच्या कॉनोलीने शतकी खेळी केली. मात्र इतर फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही आणि संघाला २०२ धावांपर्यंत मजल मारता आली.**

■ हैदराबाद

**पंजाबने** नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. हैदराबादचे सलामीवीर अभिषेक शर्मा व ट्रॅव्हिस हेड यांनी सुरुवातीपासून फटकेबाजी सुरू केली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ३.२ षटकांत ५४ धावा केल्या. मग पुढच्या चेंडूवर अभिषेक शर्मा मोठा फटका मारण्याच्या नादात झेलबाद झाला. त्याने १३ चेंडूंत ३५ धावा केल्या. ईशान किशन आणि हेड यांनी कोणत्याही परिस्थितीत धावांची गती कमी होऊ दिली नाही. या जोडीने संघाची धावसंख्या ६.३ षटकांत १ बाद ८४ धावा केल्या. त्यानंतर १९ चेंडूंत ३८ धावांवर खेळणारा हेड हा युझवेंद्र चहलच्या गोलंदाजीवर षटकार मारण्याच्या प्रयत्नात सीमारेषेवर झेलबाद झाला. हेनरिक क्लासेनच्या साथीत किशनने पंजाबच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेऊन चौकार-षटकार ठोकले. संघाची धावसंख्या १४.३ षटकांत २ बाद १७२ धावांवर पोहोचताच ईशान ३२ चेंडूंत ५५ धावा करून तंबूत परतला. मग शेवटी नितीश कुमार रेड्डी आणि क्लासेन यांनी अनुक्रमे १३ चेंडूंत २९ धावा व ४३ चेंडूंत ६९ धावा करून नाबाद तंबूत परतले. त्यामुळे हैदराबादने निर्धारित षटकात ४ बाद २३५ धावांपर्यंत मजल मारली.

या धावसंख्येचा पाठलाग करणाऱ्या पंजाबची सुरुवात अतिशय खराब झाली. प्रियांश आर्य १, प्रभसिमरन सिंग ३ आणि कर्णधार श्रेयस अय्यर ५ धावा करून हे फलंदाज एकामागून एक बाद झाले. त्यामुळे पंजाबची अवस्था ३.१ षटकांत ३ बाद २३ अशी झाली असताना कूपर कॉनोली आणि मार्कस स्टोइनिस यांनी पंजाबच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. मात्र शिवांग कुमारने मार्कस स्टोइनिसला बाद करून तंबूत धाडले. त्याने १४ चेंडूंत २८ धावा केल्या. सूर्यांश शेडगेच्या साथीत कूपर कॉनोलीने संघाचा डाव पुढे नेला. शेडगे २५ धावांवर खराब फटका मारून झेलबाद झाला. शशांक सिंगही षटकार मारण्याच्या नादात झेलबाद झाला. कॉनोलीने ३४ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. कॉनोली व जानसेन या जोडीसमोर विजयासाठी २४ चेंडूंत ९४ धावांची आवश्यकता होती. मात्र कॉनोलीने फटकेबाजी करून शतक ठोकले. अखेर पंजाब ७ बाद २०२ धावांपर्यंत पोहोचू शकल्यामुळे हैदराबाद ३३ धावांनी हा सामना जिंकला.

## आयपीएलचा महाअंतिम सामना बंगळुरुऐवजी अहमदाबादमध्ये होणार

■ बंगळुरु

**बीसीसीआयने** आयपीएलच्या प्लेऑफ सामन्यांच्या तारखा आणि ठिकाणे जाहीर केली. आयपीएलचा अंतिम सामना ३१ मे रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाईल. यापूर्वी हा सामना बंगळुरु येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर होणार असल्याचे ठरवले होते. कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेने बीसीसीआयच्या या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु गतविजेता असल्याने अंतिम सामना पारंपरिकरित्या बंगळुरुमध्ये आयोजित करण्याचे ठरले होते. मात्र बीसीसीआयने कोणतेही कारण न देता हा महत्त्वपूर्ण सामना अहमदाबादला हलवला. मात्र, बीसीसीआयने म्हटले आहे की, स्थानिक संघटना आणि अधिकाऱ्यांच्या काही मागण्यांमुळे स्थळ बदलण्यात आले.

आयपीएलचा पहिला प्लेऑफ सामना म्हणजेच क्वालिफायर १ धर्मशालामध्ये २६ मे रोजी खेळला जाईल. त्यानंतर चंदीगड येथील न्यू इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर २७ मे रोजी एलिमिनेटर आणि २९ मे रोजी क्वालिफायर २ खेळला जाईल. या हंगामाचा महाअंतिम सामना ३१ मे रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाईल.

## ओम साईश्वर मंडळ, समर्थ व्यायाम मंदिर अजिंक्य

मुंबई - माटुंगोतील ओम समर्थ भारत व्यायाम मंदिराच्या मैदानावर रंगलेल्या महाराष्ट्र ॲमॅच्युअर स्पोर्ट्स असोसिएशन आयोजित किशोर-किशोरी (सब ज्युनिअर) मुंबई जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेच्या अंतिम फेरीत अक्षरशः थरार, टाळ्यांचा कडकडाट आणि विजेतेपदासाठी प्राणपणाची झुंज पाहायला मिळाली. अखेर किशोर गटात ओम साईश्वर सेवा मंडळ आणि किशोरी गटात श्री समर्थ व्यायाम मंदिर (अ) यांनी दमदार कामगिरी करत अजिंक्यपदावर आपले नाव कोरले. बक्षीस वितरण समारंभ उन्मेश नरवणे (अध्यक्ष-ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर), प्रकाश नकाशे (सेक्रेटरी-महाराष्ट्र म. स्पोर्ट्स असोसिएशनचे), ॲड. अरुण देशमुख, बाळासाहेब तोरसकर यांच्या उपस्थितीत पार पडला.

## राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत सोहम, ईश्वर, संतोष, अजय किताब विजेते

■ ठाणे

**नवी** मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनच्या सौजन्याने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय उंची गटाच्या शरीरसौष्ठव स्पर्धेत सोहम धामणकर, ईश्वर ढोलम, संतोष बंगेरा आणि अजय कडू यांनी अनुक्रमे विविध वयोगटात किताबाचा मान मिळवला.

नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव डॉ.विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेसाठी नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनचे उपाध्यक्ष विजय पाटील, चेअरमन दत्तू बी.पाटील (हेल्थ क्लब) खजिनदार संजय निकम यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनने मेचुएर बॉडी बिल्डिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संघटनेच्या सहकार्याने या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले. या स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी केले. या स्पर्धेच्या वेळी हौशी संघटनेच्या माध्यमातून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, उपनगर येथे कार्यरत असलेल्या सेवाभावी कार्यकर्त्यांचा, पंच यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये नंदकुमार तावडे, अरुण कुरळे, प्रवीण खामकर, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रशांत नारकर (सर्व मुंबई), सुरेंद्र महाडिक (नवीमुंबई), हेमंत पाटील (उपनगर मुंबई), गिरीश शेट्टी (ठाणे) यांचा समावेश होता.

**आयबीसी २०१६ अन्वये ई-लिलाव विक्री सूचना**

**डेक्स-विन पॉलिमर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)**
संपर्क पत्ता: १०५ लोटस बिझनेस पार्क, राम बाग लेन, ऑफ एस व्ही रोड, मालाड पश्चिम, मुंबई – ४०० ०६४. सीआयएन: U17120MH1990PTC057006 ईमेल: agirp06@gmail.com

दि.१७.३.२०२० च्या आदेशानुसार माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा मंडळ, मुंबई खंडपीठाने नियुक्त केलेल्या परिसमापकाद्वारे परिसमापन इस्टेटचा भाग असलेल्या डेक्स-विन पॉलिमर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या (परिसमापनात) मालमत्तेची विक्री. ही विक्री https://ibbi.baanknet.com या ई-लिलाव प्रणालीद्वारे अधोस्वाक्षरीकृत व्यक्तीद्वारे केली जाईल.

| | | | |
|---|---|---|---|
| **लिलावाची तारीख आणि वेळ (५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)** | गुरुवार, २८.०५.२०२६ दु.१.०० ते दु.२.०० वा. | | |
| **इरठे सादर करण्याची शेवटची तारीख** | २६.०५.२०२६ | | |
| **निरीक्षणाची तारीख आणि वेळ** | २२.०५.२०२६ पर्यंत, लिक्विडेटरला पूर्वसूचना देऊन | | |
| **मालमत्ता** | **आरक्षित मुल्य (रू. मध्ये)** | **सुरुवातीची इरठे रक्कम (रू. मध्ये)** | **वाढीव बोली (रू. मध्ये)** |
| **लॉट क्र.४** – एसपी तलंगे इंडस्ट्रीयल इस्टेट, फॉरेस्ट नाका, चिकलोली एमआयडीसी, अंबरनाथ ४२१५०१ येथे आठ (८) गाळे. | ५६,९०,५००/- | ५,६९,०५०/- | १,००,०००/- |

**ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत:**
१. ई-लिलाव जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, जसे आहे जेथे आणि कोणत्याही संसाधनाशिवाय या आधारावर आयोजित केला जात आहे आणि मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार https://ibbi.baanknet.com द्वारे ऑनलाईन केला जाईल.
२. मालमत्तेची माहिती, ऑनलाइन ई-लिलाव बोली फॉर्म, बोलीदाराने जाहीर केलेला घोषणापत्र, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सामान्य अटी आणि शर्तींचा समावेश असलेला संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home या वेबसाईटवर उपलब्ध आहे आणि परिसमापकाकडे देखील उपलब्ध आहे आणि विशिष्ट विनंतीनुसार agirp06@gmail.com वर शेअर केला जाऊ शकतो.
३. संभाव्य बोलीदाराने बान्कनेट लिलाव प्रणालीद्वारे इसारा रक्कम ठेव जमा करावी.
४. संभाव्य बोलीदारांनी अशी हमी सादर करावी की त्यांना लागू असलेल्या मर्यादेपर्यंत संहितेच्या कलम २९ए अंतर्गत कोणत्याही अपात्रतेचा सामना करावा लागत नाही आणि कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, जमा केलेली इसारा रक्कम जप्त केली जाईल.

**दिनांक: ०६.०५.२०२६**
**ठिकाण: मुंबई**
**सही/- अनिश गुप्ता - परिसमापक - डेक्स-विन पॉलिमर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)**
**आयबीबीआय नोंदणी क्र. IBBI/IPA-002/IP-N00285/2017-18/10843**

**जाहीर सूचना**

एचडीएफसी बँकेच्या वतीने सूचना देण्यात येत आहे. याद्वारे कळविण्यात येते की श्री. मदन जे. यबाजी हे फ्लॅट क्र.३०३, ३रा मजला, उन्नती गार्डन्स, ए हेलिक्स, हेलिक्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड म्हणून ज्ञात सोसायटीतील, पोखरण रोड क्र. १, ठाणे (पश्चिम) – ४००६०६ चे मालक आहेत. यव्यतिरिक्त कळविण्यात येते की हेलिक्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड यांनी दिनांक २५.०३.२००९ रोजी श्री. मदन जे. यबाजी यांच्या नावे जारी केलेले भाग प्रमाणपत्र क्र.११ (प्रत्येकी रु. ५०/- चे पूर्ण भरलेले ५ शेअर्स, विशिष्ट क्र.५१ ते ५५ (दोन्ही समाविष्ट) हरवले/गहाळ झाले आहे आणि याबाबत राबोडी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली असून त्याचा नोंदणी आयडी: आरएबी१६५ आहे.
सर्व व्यक्तींना विषय मालमत्तेवर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री, देवाणघेवाण, भेटवस्तू, भाडेपट्टा, वहिवाट, परवाना, गहाणखत, शुल्क, धारणाधिकार, न्यास, वारसा, मृत्युपत्र, सुखसोयी, ताबा, लागवड, व्यवसाय, देखभाल, सामंजस्य करार, विकास हक्क, विक्रीचा करार किंवा अन्यथा काहीही असो याद्वारे कोणत्याही स्वरूपाचा कोणताही अधिकार, शिर्षक, हितसंबंध, लाभ, दावा किंवा मागणी असल्यास त्यांनी आवश्यक त्या लेखी स्वरूपात, त्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यासह, खाली स्वाक्षरी करणाऱ्यांना पी.ओ.क्र. व्ही. पत्के अँण्ड कं.ॲडव्होकेट्स, एफ-१, १ला मजला, शाह आर्केड, राणी सती मार्ग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, मालाड (पूर्व), मुंबई - ४०० ०९७ येथे या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवणे, अन्यथा असे मानले जाईल की अशा सर्व व्यक्तींनी विषय मालमत्तेतील त्यांचे सर्व दावे, अधिकार, हितसंबंध आणि कोणत्याही स्वरूपाचे शिर्षक सोडून दिले आहेत आणि विषय मालमत्तेमध्ये त्यांचा कोणताही दावा, अधिकार, शिर्षक किंवा हितसंबंध उरलेला नाही.
आज दिनांकित ७ मे २०२६
**व्ही. पत्के अँड कं. - ॲडव्होकेट्स**
एफ-१, १ला मजला, शाह आर्केड, राणी सती मार्ग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, मालाड (पूर्व), मुंबई -४०० ०९७.

**जाहीर सूचना**

येथे **सूचना** देण्यात येते की आम्ही, थिंक लॉ, वकील, खाली नमूद केलेल्या **अनुसूचीत** लिखित अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेच्या शिर्षकाची चौकशी करीत आहोत.
सर्व व्यक्तिस/संस्थेस खालील अनुसूचीत नमूद केलेल्या मालमत्तेबाबत विक्री, अदलाबदल, देणे, भाडेपट्टा, परवाना, नियुक्ती, गहाण, वारसा, वसीयत, उत्तराधिकार, भेट, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, मृत्यूपत्र, सुखसोयी, ट्रस्ट, ताबा, कौटुंबिक करार/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करारनामे, विकास हक्क, भागीदारी किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शिर्षक, दावा, लाभ, मागणी किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या दाव्याचे पुरावे जोडून, या जाहीर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत खाली नमूद पत्त्यावर स्वाक्षरीकर्त्यास लेखी स्वरूपात कळवावे, अन्यथा, असे कोणतेही दावा किंवा दाव्यांचा त्याग केला आहे व ते माफ केले आहेत असे मानले जाईल.

**अनुसूची**
बिगर शेत जमीन किंवा मैदान असलेले **प्लॉट क्र. ५, क्षेत्रफळ एच.००=१३.७७ आर**, सर्व्हे क्र.३५ (तसेच सर्व्हे क्र.३५/१ए१ + ३५/१ए२ + ३५/१बी/१/१ च्या मंजूर ले-आउटमधील प्लॉट क्र.५ मोजमाप क्षेत्र सुमारे १३७७ चौ.मीटर्स) मधून, समर हिल प्लॉट ओनर्स को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. या योजनेअंतर्गत, गाव कुने नामा, गट ग्रामपंचायत कुने नामा हद्दीत, नोंदणी उपजिल्हा मावळ, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथील सर्व भाग व खंड, तसेच सदर सोसायटीचे ५ शेअर्स, शेअर क्र. ४११ ते ४१५ दोन्ही समाविष्ट, भाग प्रमाणपत्र क्र.८३ सह, या मालमत्तेशी संबंधित आहेत आणि चतुसिमा पुढीलप्रमाणे:
**पूर्वेस वा त्या दिशेने :** सर्व्हे क्र. ३४ (भाग) आणि सर्व्हे क्र. ३५ (भाग), तसेच सर्व्हे क्र. ४०
**दक्षिणेस वा त्या दिशेने :** सर्व्हे क्र. ३० व ३२
**पश्चिमेस वा त्या दिशेने :** सर्व्हे क्र. ३३ व ३४
**उत्तरेस वा त्या दिशेने :** प्लॉट क्र. ४ व ६
आज दिनांकित ०७ मे, २०२६ रोजी
**तुषार अजिंक्य**
**व्यवस्थापकीय भागीदार,**
थिंक लॉ, वकील
३रा मजला, सी विंग, मित्तल टॉवर, नरीमन पॉइंट, मुंबई – ४०००२१

**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**जाहीर निवेदन**

**CIN No. U40109MH2005SGC153646**

अउदा संवसु विभाग, डोंबिवली विभागातील १०० के.व्ही. मुरबाड उपकेंद्र मधून विद्युत पुरवठा होणाऱ्या सर्व ग्राहकांना सूचित करण्यांत येते की, शुक्रवार दि. ०८.०५.२०२६ रोजी खालील वीज वाहिन्यांचा वीज पुरवठा देखभाल व दुरुस्तीचे काम करण्यासाठी खाली दर्शविलेल्या वेळेत बंद राहील. तरी संबंधीत ग्राहकांनी कृपया सहकार्य करावे.

| Sr.No. | Substation | Feeder No. | Date & Time | Areas |
|---|---|---|---|---|
| 1 | 100 KV MURBAD SUB STN | 22 KV MHASA | Date: 08/05/2026 From: 09:00 hrs. To 11:00 hrs. Total Duration: 02 hrs. | 22 KV MHASA |
| 2 | | 22 KV APL APOLLO | | 22 KV APL APOLLO |
| 3 | | 22 KV UMROLI | | 22 KV UMROLI |
| 4 | | 22 KV MIDC - 2 | | 22 KV MIDC - 2 |
| 5 | | 22 KV MURBAD TOWN | | 22 KV MURBAD TOWN |

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Division, Dombivali

# 'म्हातारीचा बुट' दुरुस्त करणार पालिकेकडून ७.२९ लाख खर्च होणार

■ मुंबई

**मलबार** हिल येथील कमला नेहरू पार्कमधील 'म्हातारीचा बूट' या ७ दशके जुन्या प्रतिष्ठित वास्तूची दुरुस्ती आणि जीर्णोद्धार करण्याची योजना पालिकेने आखली आहे. त्यासाठी ७ लाख २९ हजार रुपये खर्च केला जाणार आहे.

हँगिंग गार्डनसमोर असलेला हा 'म्हातारीचा बूट' 'देअर वॉज अॅन ओल्ड वूमन हू लिव्हड इन अ शू' या इंग्रजी बालगीतावरून प्रेरित आहे. महापालिकेचे माजी पर्यावरण अधिकारी आणि नीरीचे माजी अभियंता सोली आर्सीवाला यांनी १९५२ मध्ये ही रचना तयार केली होती. त्यानंतर ही वास्तू जनतेसाठी खुली झाली. या प्रतिष्ठित वास्तूची देखभाल आणि संवर्धनासाठी महापालिका विशेष यंत्रणा उभारणार आहे.

पालिकेने यासाठी विविध अभियांत्रिकी संस्थांसाठी निविदा जारी केली आहे. सुरुवातीला मोडॉक सिमेंट मार्बल, ग्रॅनाइट, शहाबाद किंवा भारतीय दगडांचे



फ्लोअरिंग आणि ग्लेज्ड टाइल्स काढल्या जातील. तसेच स्टीलवर्क, रिइन्फोर्समेंट बारपर्यंतचे काँक्रीट व पृष्ठभागावरील अशुद्धी दूर केल्या जातील. त्यानंतर गंजरोधक प्रायमर, अँटी-कॉरोसिव्ह पेंट, ग्रिल्स, मॉडिफाइड सिमेंट लावले जाईल. यात सजावटीचे प्रवेशद्वार आणि नैसर्गिक दगडांच्या पॉलिशचा समावेश आहे.

# भोंदू बाबाला कठोर शिक्षा करावी
## कासा प्रकरणातील पीडितेची अपेक्षा

■ डहाणू

**नराधम** भोंदू बाबाला कठोरात कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी कासा येथील भोंदू बाबाच्या अत्याचाराला बळी पडलेल्या १३ वर्षीय पीडित मुलीने केली आहे. अघोरी उपचाराच्या नावाखाली एका भोंदू बाबाने तिच्यावर मध्यरात्री बलात्कार केला होता. आज विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहीत पवार यांनी मुलीची भेट घेऊन विचारपूस केली. त्यावेळी पीडित मुलगी आणि तिच्या कुटुंबियांनी शेवटपर्यंत लढण्याचा निर्धार व्यक्त केला. पालघरमध्ये राहणाऱ्या १३ वर्षीय मुलीवर शिवराम सावर (५५) या भोंदू बाबाने अघोरी पूजेच्या नावाखाली डहाणू येथील जंगलात नेऊन बलात्कार केला होता. या घटनेचे तीव्र पडसाद महाराष्ट्रात उमटले आहे. आज निलम गोऱ्हे आणि रोहित पवार यांनी मुलीच्या कुटुंबियांची भेट घेतली. राज्यात महिला अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

# अवकाळी पावसाचा तडाखा पिके जमीनदोस्त

■ भंडारा

**राज्यातील** विविध भागांत अवकाळी पावसामुळे पिके कोसळल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भंडारा जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. वाशिम आणि चंद्रपूरमध्येही नुकसानीच्या घटना समोर आल्या आहेत. चंद्रपूर येथे काल वाऱ्यामुळे शेड कोसळून एकाचा मृत्यू झाला.

## एकाचा मृत्यू

भंडारा, तुमसर आणि मोहाडी तालुक्यांत जोरदार पावसासह वादळी वाऱ्यामुळे भातपीक जमिनीवर आडवे झाले आहे. सध्या कापणीच्या टप्प्यावर असलेल्या भातपिकाला मोठा फटका बसल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहेत. याशिवाय मका व आंबा बागायतींचेही नुकसान झाले आहे. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला, तरी शेतकऱ्यांची चिंता मात्र वाढली आहे. वाशिम जिल्ह्यातील रिसोड शहरासह कंकरवाडी, आगरवाडी व परिसरातही वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे केळी पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मफतलाल हाऊस, पहिला मजला, एच.टी. पारेख मार्ग, १६९, बॅकबे रिक्लमेशन, चर्चगेट, मुंबई - ४०००२०**
**दुरध्वनी: (९१२२) ४१५८०९९२ / ४१५८०९९४ /९५/९७**

MAHARASHTRA TOURISM

**निविदा सुचना / मपविम/बांधकाम/२०२६-२७/०१ (ऑनलाईन)**

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचेकडुन खालील कामांसाठी (अधिकृत डिजीटल स्वाक्षरी प्रमाणधारक) विस्तृत निविदा सुचनेत नमुद केलेल्या पुर्व अर्हता पात्र संस्थांकडून ऑनलाईन स्वारस्याची अभिरुची (EoI) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार |
|---|---|---|
| १ | Empanelment Of Consultancy Services for Third Party Inspection of Ongoing Tourism Infrastructure works at Konkan, Nashik, Pune, Chatrapati Sambhajinagar & Nagpur -Amravati Region | EOI |

खालील संकेतस्थळावरून विस्तृत निविदा सुचना व ई-निविदेची माहिती उपलब्ध आहे.
- http://mahatenders.gov.in

सही/-
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.

क्रमांक: आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी ६३८

# अनुदानित शाळांतील शिक्षकांवर निवडणूक कामासाठी दबाव

■ मुंबई

**महापालिकेच्या** शाळांतील शिक्षकांवर निवडणुकीच्या कामांची जबाबदारी सोपविल्यानंतर आता खासगी अनुदानित शाळांतील शिक्षकांवरही या कामासाठी दबाव आणला जात आहे.

## दी शिक्षण मंडळाचे पालिका आयुक्तांना पत्र

महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून खासगी शाळांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मतदारयाद्यांच्या कामासाठी पाठविण्याबाबत व्हॉट्सअॅपवर धमकीवजा आदेश दिले जात असल्याचा दावा दी शिक्षण मंडळाने केला आहे. याबाबत मंडळाने पालिका आयुक्त डॉ. अश्विनी भिडे यांनी यात हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे.

दी शिक्षण मंडळाने आपल्या पत्रात म्हटले आहे की, मतदारयादीची फेररचना करण्यासाठी या शिक्षकांना काम दिले आहे. मात्र या कामास नकार देणाऱ्या शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस,निलंबन करणे,पोलीस कारवाई करणे, वेतन शून्यांकित करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. ज्या शाळांचे शिक्षक बीएलओची ड्युटी स्वीकारणार नाही, अशा शाळांच्या मुख्याध्यापकांना करीरोड येथील कार्यालयात उपस्थित राहण्याची सूचना देण्यात आली आहे.

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**
(म्हाडा घटक)

म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना**

ई-निविदा क्र. का.अ./फ-द/मुं.इ.दु.व पु.मं./११/२०२६

Main Portal: https://mahatenders.gov.in
MHADA Portal: https://mhada.gov.in

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, सनशाईन प्लाझा, २ रा मजला, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, (पुर्व), मुंबई-४०० ०१४ यांचेकडे मुंबई शहर जिल्हा अंतर्गत Deputy District Registrar यांचेकडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या पात्र मजूर सहकारी संस्थाकडून एकूण ०२ कामाकरिता बी-१ (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहोत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | टप्पा | कालावधी | अ.क्र | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | निविदा विक्री सुरु | ०७/०५/२०२६ सकाळी १०.१० | २. | निविदा विक्री बंद | १४/०५/२०२६ सायंकाळी ४.०० |
| ३. | तांत्रिक बोली उघडणे | १५/०५/२०२६ सायंकाळी ४.०० | ४. | आर्थिक बोली उघडणे | १८/०५/२०२६ सकाळी ११.०० |

कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. सशर्त ऑफर्स स्विकारल्या जाणार नाहीत.
टिप : १) कृपया वेबसाईटवर निविदा सूचना पहा.
२. शुद्धीपत्रक/ दुरुस्ती जर काही असेल तर ती फक्त वेबसाईटवर प्रकाशित करण्यात येईल.

CPRO/A/367
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता/फ (दक्षिण) विभाग,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई निविदा सूचना क्रमांक १४/२०२६-२०२७ (मुंबई)**
म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | ठेव अंशदान काम... सिप्झ... सिप्झ सेझ अंधेरी येथील एसटीपी भूखंड व भूखंड क्र. ३६ जवळील अंशतः कोसळलेली व जीर्ण झालेल्या संरक्षक भिंतीची पुनर्बांधणी करणे तसेच भूखंड जीजे - ११ जवळील संरक्षक भिंतीचे बळकटीकरण करणे व प्रवेशद्वार क्र. ३ जवळ नवीन संरक्षक भिंत बांधणे. | १,४७,२३,३२९.०० |

उपरोक्त कामाबाबतचे निविदा प्रपत्र दिनांक ०८/०५/२०२६ ते दिनांक २२/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १२/०५/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक १५/०५/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# अॅक्वा लाईन मेट्रो ठप्प
## तांत्रिक बिघाडामुळे प्रवाशांचे हाल

■ मुंबई

**मुंबईतील** अॅक्वा लाईन मेट्रो सेवेत तांत्रिक बिघाड झाल्याने आज प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. कफ परेडहून आरे कॉलनीकडे जाणारी मेट्रो बिघाडामुळे अचानक मार्गातच थांबली. त्यानंतर सुमारे २० ते २५ मिनिटे सेवा ठप्प झाली होती.

मुंबई मेट्रो अॅक्वा लाईन वरील सहारा रोड स्थानकाजवळ ही घटना घडली. दुपारी सुमारे ३.५६ वाजता निघालेली ट्रेन तांत्रिक अडचणीमुळे मध्येच थांबली. यामुळे प्रवाशांमध्ये काही काळ घबराट पसरली. परिस्थिती लक्षात घेऊन मेट्रो प्रशासनाने प्रवाशांना ट्रेनमधून खाली उतरवले आणि पर्यायी व्यवस्थेद्वारे त्यांना पुढील प्रवासासाठी पाठवले. काही वेळानंतर दुसरी ट्रेन उपलब्ध करून देत प्रवाशांना पुढे पाठवण्यात आले. यामुळे सीप्झ आणि इतर काही स्थानकांवरही मेट्रो सेवा प्रभावित झाली. ऑफिस सुटण्याच्या वेळेत हा बिघाड झाल्याने स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी झाली. साधारणपणे ५ मिनिटांच्या अंतराने धावणाऱ्या गाड्या सध्या १० मिनिटांच्या अंतराने धावत असल्याने प्रवाशांची गैरसोय झाली.

महावितरण

**ई-निविदा सुचना**

म.रा.वि.वि.कं.मर्या., दैनंदिन सनियंत्रण कक्ष (डी.एस.एस कंट्रोल रुम) पुणे परिमंडळ मध्ये बाहयस्त्रोताव्दारे मनुष्यबळ पुरविणेसाठी पात्र व नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालीलप्रमाणे ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. कामाचे स्वरुप,निर्दिष्ट क्षेत्र,अंदाजित रक्कम,बयाना रक्कम ईत्यादी तपशीलांसाठी ई-निविदा कागदपत्रे महावितरणच्या संकेतस्थळावर http://works.mahadiscom.in/e-Tender/etender दि.२१.०५.२०२६ पर्यंत उपलब्ध आहेत. येथुन डाऊनलोड करण्यात यावी. कोणतेही कारण न देता सदर ई-निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधिक्षक अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या,रास्तापेठ शहर मंडल,पुणे यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच ई-निविदा प्रणालीबाबत काही शंका असल्यास serastapeth@gmail.com येथे संपर्क साधावा. सदर ई- निविदा सादर करतांना (EMD) बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे. (EMD) बयाणा रक्कम न भरणा-या एजन्सीची निविदा ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | SE/RPUC/HR/OS/T/४५/२०२६-२७ | पुणे झोन,रापेशमं,रास्तापेठ चाचणी विभाग, ग्राहक सुविधा केंद्र पुणे. |
| २ | SE/RPUC/HR/OS/T/४६/२०२६-२७ | रास्तापेठ विभागांतर्गत बाहयस्त्रोताव्दारे कंत्राटी कामगारांच्या सेवा पुरविणे बाबत. |
| ३ | SE/RPUC/HR/OS/T/४७/२०२६-२७ | पर्वती विभागांतर्गत बाहयस्त्रोताव्दारे कंत्राटी कामगारांच्या सेवा पुरविणे बाबत. |
| ४ | SE/RPUC/HR/OS/T/४८/२०२६-२७ | पदमावती विभागांतर्गत बाहयस्त्रोताव्दारे कंत्राटी कामगारांच्या सेवा पुरविणे बाबत. |
| ५ | SE/RPUC/HR/OS/T/४९/२०२६-२७ | बंडगार्डन विभागांतर्गत बाहयस्त्रोताव्दारे कंत्राटी कामगारांच्या सेवा पुरविणे बाबत. |
| ६ | SE/RPUC/HR/OS/T/५०/२०२६-२७ | नगररोड विभागांतर्गत बाहयस्त्रोताव्दारे कंत्राटी कामगारांच्या सेवा पुरविणे बाबत. |

**HO PR NO 107 /26** — अधीक्षक अभियंता, रास्तापेठ शहर मंडल, पुणे.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**सआएल/सा/ ३२९ /सहा.अभि. (परि.) दि.०६/०५/२०२६**

**विषय :** एल विभागातील प्रभाग क्र. १५६ ते १७१ करीता परिरक्षणसंबंधित विविध कामांसाठी अशासकीय संस्थांमार्फत कामगार/मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिता दि. १८.०५.२०२६ ते १७.११.२०२६ या कालावधीकरीता जाहीरात देऊन सोडतीद्वारे संस्थेची नियुक्ती करण्याबाबत.

**स्वारस्य अभिव्यक्ती**
**जाहिरात**

'एल' विभागामध्ये प्रभाग क्र. १५६ ते १७१ मधील परिरक्षणसंबंधित विविध कामाकरीता लागणारे कामगार / मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिता प्रत्येक प्रभागासाठी अशासकीय संस्थेची नेमणूक करण्यासाठी 'एल' विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणाऱ्या इच्छुक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ.संस्थेमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरिता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. (कामाचा कालावधी दि. १९.०५.२०२६ ते १८.११.२०२६)

| अ. क्र. | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था (प्रत्येक प्रभागासाठी) |
|---|---|---|
| १ | एल विभाग प्रभाग क्र. १५६ ते १७१ मध्ये परिरक्षण संबंधित विविध कामासाठी ( कामाचा कालावधी दि. १९.०५.२०२६ ते १८.११.२०२६) लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिता प्रत्येक प्रभागासाठी संस्थेची नियुक्ती करणे. ( प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र अर्ज उपलब्ध केले जातील त्याप्रमाणे प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र फॉर्म फी आणि इसारा रक्कम घेण्यात येईल.) | 1 |

- 'एल' विभागातील इच्छूक पात्र संस्थाना दि. ०७.०५.२०२६ ते १५.०५.२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत 'एल' विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) खात्याकडून फॉर्म फी करीता रुपये १६०० /- + १८% जीएसटी इतक्या रकमेचे चलान देण्यात येईल.
- सदर चलनाचा भरणा नागरी सुविधा केंद्र ( C. F.C.) येथे जमा केल्यानंतर अर्जाचा नमुना आणि इसारा रक्कम रु. ८,२००/- चे चलान देण्यात येईल. सदर चलनाचा भरणा 'बृहन्मुंबई महानगरपालिका' (BMC) या नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या डी. डी. व्दारे करणे आवश्यक आहे.
- विहित नमुना अर्ज आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन मोहोर बंद पाकिटात दि. १५.०५.२०२६ रोजी सायं. ५ पूर्वी 'एल' विभागातील मुख्य लिपिक 'व्यय' खात्यात जमा करावे. नमुद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.
- प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र संस्थांची निवड यादी तयार करुन सदर यादीतुन सोडतीव्दारे संस्थेची निवड करण्यात येईल आणि यशस्वी झालेल्या संस्थेला कामाचे वाटप सहाय्यक आयुक्त 'एल' विभाग, योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.
- उपरोक्त नमुद कामासाठी संस्थेची निवड करण्याची प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार सहाय्यक आयुक्त 'एल' विभाग यांचेकडे आहेत.

सही/- सहाय्यक अभियंता (परि.) 'एल'/पू. विभाग
सही/- सहाय्यक अभियंता (परि.) 'एल'/प विभाग

पीआरओ/२७४/जाहि./२०२६-२७

रवाण्यापूर्वी तसेच शौचानंतर साबणाने हात स्वच्छ धुवावे

# बीडमध्ये गोठ्याला आग वृद्धासह २५ जनावरांचा मृत्यू

■ बीड

**शॉर्टसर्किटमुळे** एका जनावराच्या गोठ्याला भीषण आग लागली. या आगीत एका वृद्धासह १० गायी,१५ शेळ्या आणि १५० कोंबड्यांचा होरपळून मृत्यू झाला. धारूर तालुक्यातील रेपेवाडी येथे ही दुर्घटना घडली.

रेपेवाडी येथील अशोक रामभाऊ रेपे यांच्या घराशेजारील गोठ्याला काल सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास आग लागली. वाळलेला चारा आणि लाकडी साहित्यामुळे आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण केले. आग लागली तेव्हा अशोक रेपे यांचे वडील रामभाऊ एकनाथ रेपे हे गोठ्यात होते. आगीच्या ज्वाळा इतक्या भीषण होत्या की, त्यांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. या आगीत होरपळून त्यांचा जागीच मृत्यू झाला. या आगीत केवळ जीवितहानीच नाही,तर रेपे कुटुंबाचे मोठे नुकसान झाले.

# अकोल्यात ५५ वर्षीय इसमाचा १० वर्षीय मुलीवर अत्याचार

**अकोला** - पुण्यातील नसरापूर येथील घटनेची चर्चा सुरू असतानाच अकोला जिल्ह्यातून आणखी एक संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. अकोल्याच्या पातूर तालुक्यातील चान्नी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ५५ वर्षीय इसमाने १० वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. पीडित मुलीचे आई-वडील शेतमजूर असून ते नेहमीप्रमाणे कामासाठी शेतात गेले असताना आरोपीने संधी साधली. प्राथमिक माहितीनुसार, गेल्या चार ते पाच दिवसांपासून आरोपी मुलीला धमकावत तिच्यावर अत्याचार करत होता. भीतीपोटी मुलगी गप्प होती; मात्र छळ असह्य झाल्यानंतर तिने धीर एकवटून सोमवारी ५ मे रोजी संध्याकाळी आई-वडिलांना घडलेला प्रकार सांगितला.

महाराष्ट्र शासन वस्तू व सेवा कर विभाग
सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**वस्तू व सेवा कर विभाग, राज्यकर सहआयुक्त, नोडल विभाग १३, मुंबई यांचे कार्यालय, मुंबई**
**अ- इमारत, तळ मजला, वस्तू व सेवाकर भवन, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.**
**E-mail- sursection@gmail.com**
**सेवानिवृत्त राज्यकर निरीक्षक यांची करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबत.**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या क्र : संकिर्ण-२७१५/प्र. क्र. १००/१३, दिनांक १७ / १२ / २०१६ मधील तरतुदीनुसार या विभागातील, सेवा व आस्थापनाविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील राज्यकर निरीक्षक या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी यांची, गट-ब (अराजपत्रित) एकूण १ पदांकरिता करार पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी सेवानिवृत्त राज्यकर निरीक्षक यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्राप्त अर्जांमधून पात्र उमेदवारांची निवड करून नामिकासुची तयार करण्यात येईल. सदर उमेदवारांमधून योग्य उमेदवाराची नेमणूक सामान्य प्रशासन विभागाच्या क्र : संकिर्ण-२७१५/प्र. क्र. १००/१३, दिनांक १७/१२/२०१६ या शासन निर्णयामधील अटी व शर्तीच्या अधिन राहून १ वर्षासाठी करार पद्धतीने करण्यात येईल.

| सर्वसाधारण अटी व शर्ती | आवेदन पत्र |
|---|---|
| १) उपरोक्त नमूद केलेल्या सेवानिवृत्त राज्यकर निरीक्षक यांना कार्यालयातील सुरक्षा, जनसंपर्क व आस्थापनाविषयक कामकाजाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असावा.<br>२) सदर अर्जदार सेवानिवृत्त राज्यकर निरिक्षक यांच्या विरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी.<br>३) अर्जदार मानसिक, शारिरिक व आरोग्यदृष्ट्या सक्षम असावा तसेच करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.<br>४) वित्तलब्धी - पात्र उमेदवारांची नेमणूक करताना सामान्य प्रशासन विभागाच्या क्रः- संकिर्ण- २७१५/प्र. क्र. १०० (भाग-१)/१३, दिनांक ०८/०९/२०२३ या शासन निर्णयामधील अटी व शर्तीनुसार त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मूळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे ) कायम राहील.<br>५) उपरोक्त नमूद केलेल्या विविक्षित कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.<br>६) आवश्यकता भासल्यास उमेदवाराची निवड करण्यासाठी मुलाखत घेतली जाईल.<br>७) नामिकासुचीनुसार नियुक्त करण्यात आलेल्या त्यांच्या कामाबाबत नियंत्रक अधिकारी समाधानी नसेल, तर अशा नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवा तात्काळ प्रभावाने रद्द करण्याबाबतचे अधिकार राज्यकर सहआयुक्त (नोडल - १३), मुंबई यांना राहतील.<br>वरीलप्रमाणे पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या सेवानिवृत्त राज्यकर निरिक्षक यांनी आस्थापना अधिकारी, राज्यकर सहआयुक्त नोडल विभाग- १३, वस्तू व सेवाकर विभाग, सहावा मजला, बी-विंग, वांद्रे, मुंबई यांच्याकडे जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विहित नमुन्यातील अर्ज टपालाद्वारे अथवा ई-मेल (sursection@gmail.com) द्वारे सादर करावेत.<br>सही/-<br>राज्यकर सहआयुक्त (नोडल-१३),<br>वस्तू व सेवाकर विभाग, वांद्रे, मुंबई. | १) उमेदवाराचे संपूर्ण नाव<br>२) जन्म तारीख<br>३) संपर्कासाठीचा पत्ता<br>४) भ्रमणध्वनी क्रमांक<br>५) ई-मेल<br>६) सेवानिवृत्त होताना धारण केलेले पद<br>७) सेवानिवृत्तीचा दिनांक<br>८) सेवानिवृत्तीचे कार्यालय<br>९) सेवानिवृत्तीवेळची वेतनश्रेणी<br>१०) सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या तीन नेमणुका<br>११) सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या पाच वर्षातील गोपनीय अहवालाची प्रतवारी<br>१२) शैक्षणिक अर्हता<br>१३) संगणकीय ज्ञान<br>१४) विभागीय चौकशी प्रलंबित आहे काय? असल्यास विवरण द्यावे.<br>१५) कार्यालयामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (१०० शब्दांमध्ये)<br>स्वाक्षरी<br>दिनांक |

क्रमांक: आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी६४४

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**TENDER NOTICE**

Tenders are invited from registered experienced license holder Electrical contractors for the work as below.

| Tender No EE/KLNR/ Tender/ | Nature of Work | Tender Amt. in Lakhs | Amount Of EMD Rs. | Tender Fee (with GST) |
|---|---|---|---|---|
| EE/KLNR/ PM.HT LT Muffing / 2026-27/T-06 | Annual tender for the work of Preventive Maintenance for MUFFING of HT /LT Poles and Crimping of Jumpers for HT Line and allied works at various locations for FY 26-27 under Kalyan Rural Division of Kalyan Circle-II. | 10.00 | 10000/- | 1180/- |

**TERMS & CONDITIONS:**
1) Blank Tender documents will be available on Company's website www.mahadiscom.in. From 08.05.2026 to 18.05.2026, up to 14.00 Hrs Tenderers are requested to download the same from website. They will pay the document cost for Tender at MSEDCL, Division office Kalyan (R) or they can deposit Bankers cheque of DD & put D.D.No. & date while submission of the offer.
2) The amount of EMD should be submitted in the form of Demand Draft/Bank Guarantee of any Nationalized/Scheduled Bank having Branch at Kalyan, Demand Draft should be drawn in favor of Executive Engineer MSEDCL Kalyan (R) and put the DD No. & date while submitting on line tender duly filled in.
3) Pre bid meeting dt. 11.05.2026 at. 15.00 hrs.
4) Last date for submission of Tenders is 18.05.2026 up to 11.00 Hrs.
5) Date of opening of Technical Bid: 18.05.2026 at 11.30 Hrs. (online only).
6) MSEDCL reserves the right to accept any tender or to reject any or all Tenders without assigning any reason thereof. Contact Person: Shri Vivek M. Singalwar, Addl. Executive Engineer Office Of The Executive Engineer, Kalyan (R) Division, Tejshree Bldg., Mobile No-8879627037

Sd/-
Executive Engineer, Kalyan Rural Division

चंदेरी च्वींगम
६
मुंबई । गुरुवार
७ मे, २०२६
नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# 'वाराणसी'ला पाणीटंचाईचा फटका



**दिग्दर्शक** एस.एस.राजामौली यांच्या 'वाराणसी' या बहुचर्चित चित्रपटाच्या चित्रीकरणात हैदराबादमधील पाणीटंचाईमुळे मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

चित्रपटाच्या निर्मिती संस्थेने गगनपहाड येथील फिल्म सिटीमध्ये बांधलेला एक कृत्रिम तलाव भरण्यासाठी १०-१० हजार लिटर क्षमतेच्या १५० टँकरची मागणी केली होती. म्हणजेच सुमारे १५ लाख लिटर पाण्याची आवश्यकता या चित्रीकरणासाठी होती. पण हैदराबादमध्ये सध्या कडक उन्हाळा असल्याने पिण्याच्या पाण्याची आणि टँकरची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. अशा परिस्थितीत व्यावसायिक वापरासाठी इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी पुरवणे सामान्य नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम करणारे ठरेल, असे कारण देत 'हैदराबाद मेट्रोपॉलिटन वॉटर सप्लाय अँड सीवरेज बोर्ड'ने (एचएमडब्ल्यूएसएसबी) ही मागणी फेटाळून लावली आहे. १८ मे २०२६ रोजी या दृश्यांचे चित्रीकरण नियोजित होते. मात्र, पाणी मिळण्यास अडचणी येत असल्याने चित्रीकरणाचे वेळापत्रक लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



# 'धुरंधर : द रिव्हेंज'चा वाद संपला!



**'धुरंधर :** द रिव्हेंज' या चित्रपटावरून सुरू असलेला कायदेशीर वाद अखेर संपुष्टात आला असून मुंबई उच्च न्यायालयाने या संदर्भातील मानहानीचा खटला बंद केला आहे. संतोष कुमार यांनी चित्रपट निर्माते आदित्य धर आणि त्यांच्या चमूची बिनशर्त माफी मागितल्यानंतर हा वाद मिटला आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, आदित्य धर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संतोष कुमार यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात मानहानीचा दावा दाखल केला होता. संतोष कुमार यांनी या चित्रपटाशी संबंधित प्रकल्पावर आपले हक्क असल्याचा दावा करत सोशल मीडिया आणि इतर माध्यमांतून खोटी माहिती पसरवल्याचा आरोप निर्मात्यांनी केला होता. या आरोपांमुळे चित्रपटाच्या प्रतिमेला धक्का पोहोचत असल्याचे निर्मात्यांचे म्हणणे होते.

न्यायालयातील सुनावणीदरम्यान संतोष कुमार यांनी मान्य केले की, त्यांनी केलेले आरोप निराधार होते. त्यांनी आदित्य धर आणि त्यांच्या चमूची जाहीर माफी मागत यापुढे अशा प्रकारचे कोणतेही दावे करणार नसल्याचे प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट केले. दोन्ही पक्षांमधील हा सामंजस्य करार लक्षात घेऊन न्यायालयाने या खटल्यावर पडदा टाकला आहे.

या निर्णयामुळे 'धुरंधर' चित्रपटाच्या पुढील वाटचालीतील कायदेशीर अडथळे आता दूर झाले आहेत.

# 'स्पिरिट'चे आगमन लांबले!



**प्रभासची** मुख्य भूमिका असलेला व संदीप रेड्डी वांगा यांच्या दिग्दर्शनाखाली साकारला जाणारा 'स्पिरिट' हा चित्रपट आता १ डिसेंबर २०२७ रोजी प्रदर्शित होणार असल्याची माहिती समोर आली आहे. यापूर्वी हा चित्रपट ५ मार्च २०२७ रोजी प्रदर्शित होणार होता; मात्र सलमान खानचा आगामी मोठा चित्रपट त्याच काळात ईदच्या मुहुर्तावर प्रदर्शित होणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला असल्याचे समजते.

बॉक्स ऑफिसवरील संभाव्य टक्कर टाळण्यासाठी आणि 'स्पिरिट'ला स्वतंत्रपणे चांगली कमाई करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने निर्मात्यांनी प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली आहे. १ डिसेंबर ही तारीख दिग्दर्शक वांगा यांच्यासाठी विशेष आहे, कारण त्यांचा मागील सुपरहिट चित्रपट 'ॲनिमल' याच तारखेला प्रदर्शित झाला होता.

या चित्रपटात प्रभास एका आक्रमक पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार असून त्याच्यासोबत तृप्ती डिमरी मुख्य भूमिकेत आहे. चित्रपटाचे चित्रीकरण २०२७ च्या सुरुवातीला पूर्ण होण्याची शक्यता असून, हा एक मोठा ॲक्शन चित्रपट असणार आहे.

# अक्षयने आटोपले केरळमधील चित्रीकरण



**प्रसिद्ध** अभिनेता अक्षय कुमारने दिग्दर्शक अनीस बज्मी यांच्या आगामी चित्रपटाचे केरळमधील चित्रीकरण पूर्ण केले असून या अनुभवाला त्याने अत्यंत खास असे संबोधले आहे. मुन्नार आणि मरायूर यांसारख्या निसर्गरम्य ठिकाणी या चित्रपटाचे दीर्घ सत्र पार पडल्याची माहिती अक्षयने सोशल मीडियाच्या आधारे जाहीर केली आहे.

अक्षयने सहकलाकार विद्या बालन आणि राशी खन्ना यांच्यासोबतचे छायाचित्र प्रसिद्ध केले आहे. या छायाचित्राच्या पार्श्वभूमीवर केरळची समृद्ध संस्कृती दर्शवणारे कथकली, मोहिनीअट्टम आणि थेय्यम या कलाप्रकारांचे कलाकार दिसत आहेत. केरळमधील चित्रीकरणाचा अनुभव व्यक्त करताना अक्षय म्हणतो की, सुंदर ठिकाणी चांगल्या लोकांसोबत काम करण्यासारखा दुसरा आनंद नाही. त्याने दिग्दर्शक अनीस बज्मी यांच्यासह संपूर्ण चमूचे आभार मानले आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने अक्षय कुमार व विद्या बालन ही जोडी चौथ्यांदा रुपेरी पडद्यावर एकत्र दिसणार आहे. तसेच, सुमारे १५ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर अक्षय व अनीस बज्मी पुन्हा एकदा एकत्र काम करत आहेत.

# ईशान झळकणार विनोदीपटात



**बॉलिवूडचा** तरुण आणि प्रतिभावान अभिनेता ईशान खट्टर आता एका विनोदी चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'गुल्लक' या गाजलेल्या वेबसीरिजचे दिग्दर्शक पलाश वासवानी या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार असून, या निमित्ताने ते चित्रपट दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण करत आहेत.

या चित्रपटाची निर्मिती हरमन बावेजा यांच्या 'बावेजा स्टुडिओज'कडून केली जात आहे. हा चित्रपट एका वेगळ्या आणि अनोख्या परिस्थितीत घडणारी विनोदी कथा असेल, असे सांगण्यात येत आहे. ईशान खट्टरने यापूर्वी 'फोन भूत' या हॉरर-कॉमेडी चित्रपटात काम केले होते, त्यानंतर पुन्हा एकदा तो विनोदी ढंगात दिसणार असल्याने चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे.

सध्या या चित्रपटासाठी नायिका आणि इतर महत्त्वाच्या कलाकारांची निवड प्रक्रिया सुरू असून, येत्या दोन महिन्यांत चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

# सलमानची मालमत्ता... २९०० कोटी!



**हिंदी** चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार सलमान खान याची एकूण संपत्ती २९०० कोटी रुपयांच्या घरात असल्याचे समोर आले असून, त्याच्या या अवाढव्य आर्थिक साम्राज्याची व्याप्ती चाहत्यांना थक्क करणारी ठरली आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ बॉलिवूडवर अधिराज्य गाजवणाऱ्या सलमानच्या उत्पन्नाचे स्रोत केवळ चित्रपट नसून त्यात विविध व्यवसायांचाही मोठा वाटा आहे.

सलमान खानच्या उत्पन्नाचा मुख्य भाग हा चित्रपटांच्या मानधनातून आणि नफ्यातील हिश्श्यातून येतो. एका चित्रपटासाठी तो अंदाजे १०० ते १५० कोटी रुपये मानधन घेतो. याशिवाय, जाहिरातींच्या विश्वातही त्याचे मोठे नाव असून, विविध ब्रँडस्च्या माध्यमातून तो दरवर्षी कोट्यवधींची कमाई करतो. केवळ अभिनयच नव्हे, तर 'सलमान खान फिल्म्स' या त्याच्या स्वतःच्या निर्मिती संस्थेच्या माध्यमातून तो चित्रपट निर्मिती क्षेत्रातही सक्रिय आहे.

दूरचित्रवाणीवरील लोकप्रिय रिॲलिटी शो 'बिग बॉस'चे सूत्रसंचालन हे सलमानच्या उत्पन्नाचे आणखी एक महत्त्वाचे साधन आहे. या शोच्या प्रत्येक सीझनसाठी तो विक्रमी मानधन आकारतो. या व्यतिरिक्त 'बीइंग ह्युमन' या त्याच्या कपड्यांच्या आणि दागिन्यांच्या ब्रँडने जगभरात बाजारपेठ विस्तारली आहे. या ब्रँडमधून मिळणारा नफा सामाजिक कार्यासाठी वापरला जात असला, तरी व्यवसाय म्हणून त्याची उलाढाल मोठी आहे. रिअल इस्टेट क्षेत्रातही सलमानने मोठी गुंतवणूक केली आहे. स्वतःच्या उत्पन्नातील मोठा हिस्सा तो दातृत्वासाठी खर्च करत असला, तरी त्याची एकूण संपत्ती आणि जीवनशैली सर्वात श्रीमंत कलाकारांच्या यादीत त्याचे स्थान अढळ करणारी आहे.

# एमएमआरडीएच्या पैशांवर म्हाडाला पाणी सोडावे लागणार

■ मुंबई

**एल्फिन्स्टन** पूल बाधितांच्या घर दुरुस्ती व रंगरंगोटीच्या कामांवर म्हाडाने १ कोटी ६७ लाख रुपये खर्च केल्याचे सांगण्यात येते. ही रक्कम एमएमआरडीएकडून वसूल करण्याचा म्हाडाचा मनसूबा होता. पण आता मात्र या रकमेवर पाणी सोडण्याची वेळ म्हाडावर आली आहे, अशी माहिती या कार्यालयातून देण्यात आली.

एल्फिन्स्टन पूल पाडून त्यावर डबल डेकर पूल बांधण्याचे काम एमएमआरडीएने हाती घेतले आहे. या पुलाच्या बांधकामाच्या आड येणाऱ्या दोन चाळी पैकी एक चाळ पाडण्यात आली आहे. यामध्ये राहणाऱ्या रहिवाशांना पर्यायी मालकी हक्काने घरे देण्यासाठी एमएमआरडीएने म्हाडाकडून दादर, वरळी, प्रभादेवी, ॲण्टॉप हिल, वडाळा आदी भागातील ७८ घरे अंदाजे ९८ कोटी रुपयांना विकत घेतली आहेत. तत्पूर्वी म्हाडाने या घरांचा एमएमआरडीएला ताबा देण्याअगोदर घरांची दुरुस्ती व रंगरंगोटीच्या कामावर १ कोटी ६७ लाख रुपये खर्च केल्याचे बोलले जाते. मात्र हा खर्च म्हाडाने माफ करावा, अशी गळ एमएमआरडीएने घातल्यामुळे या खर्चावर पाणी सोडावे लागणार असल्याचे म्हाडातील एका अधिकाऱ्याचे म्हणणे आहे.

# तुरुंगात कैद्याचा मृत्यू
## नातेवाईकांचा प्रशासनावर आरोप

**कल्याण**- कल्याण येथील आधारवाडी कारागृहात न्यायालयीन कोठडीत असलेल्या ऋषिकेश पवार या कैद्याचा मृत्यू झाल्याने गोंधळ निर्माण झाला. तुरुंग प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळेच त्याचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला.

डोंबिवलीतील ऋषिकेश पवारला हत्येच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात अटक झाली होती. तो आधारवाडी कारागृहात न्यायालयीन कोठडीत होता. काल सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास त्याला छातीत तीव्र वेदना सुरू झाल्याची माहिती आहे. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, त्यावेळी त्याला तत्काळ रुग्णालयात हलवणे आवश्यक होते.

# साताऱ्यात ६७ वर्षीय वृद्ध व्यक्तीने डोंगर फोडून रस्ता बनवला

■ सातारा

**जिल्ह्यातील** करंडी गावातील श्री सिलोबा डोंगर (गड) हे एक निसर्गरम्य आणि आध्यात्मिक ठिकाण आहे. ते ग्रामदैवत म्हणून प्रसिद्ध आहे. हे ठिकाण ट्रेकिंग आणि पर्यटनासाठी, तसेच निसर्ग सौंदर्यासाठीही ओळखले जाते, या डोंगरावरील खडतर वाट ६७ वर्षीय अशोक जाधव (नाना) यांनी एकट्याने साडेतीन किलोमीटर रस्ता खोदून सोपी केली आहे.



जाधव यांनी प्रशासनाची वाट न पाहता, कोणाचीही मदत न घेता, केवळ एका टिकाव आणि फावड्याच्या जोरावर त्यांनी साडेतीन किलोमीटरचा डोंगर पोखरून रस्ता तयार केला. गडावर जाण्यासाठी असलेली ही वाट अत्यंत खडतर, निसरडी व जीवघेणी होती. वृद्ध भाविकांना तिथे जाणे म्हणजे एक दिव्यच होते.पण आज चित्र बदलले आहे. हा चमत्कार कोणत्याही सरकारी यंत्रणेला लाजवणारा आहे. विशेष म्हणजे अशोक जाधव यांना ना प्रसिद्धीची हाव होती, ना पैशाचा लोभ ! ते दररोज सकाळी ६ वाजता हातात टिकाव, फावडा आणि खोरे घेऊन डोंगराकडे निघायचे आणि रोज किमान ५० फूट रस्ता तयार करायचा,हा त्यांचा दिनक्रम आणि निर्धार होता.

# पंढरपूरमध्ये राधा पाटीलच्या कार्यक्रमात मोठा गोंधळ

■ पंढरपूर

**पंढरपूर** तालुक्यातील सुस्ते गावात नृत्यांगना राधा पाटील हिच्या कार्यक्रमादरम्यान मोठा गोंधळ झाला. किरकोळ वादातून सुरू झालेल्या बाचाबाचीचे रुपांतर हाणामारीत होऊन कार्यक्रम अर्धवट बंद करावा लागला.

सुस्ते गावात सुरू असलेल्या यात्रेनिमित्त राधा पाटील हिच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम रंगात आला असताना अखेरच्या टप्प्यात दोन तरुणांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. यानंतर धक्काबुक्की, शिवीगाळ आणि मारहाण सुरू झाली. हा वाद काही वेळातच वाढत मोठ्या राड्यात परिवर्तित झाला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत कार्यक्रम थांबवला आणि गर्दीला शांत केले.

# 'शताब्दी'च्या नूतनीकरणाचे काम वेगाने करण्याच्या आयुक्तांच्या सूचना

■ मुंबई



**कांदिवली** पश्चिमेकडील मुंबई महानगरपालिकेच्या शताब्दी रुग्णालयाच्या नूतनीकरणाचे काम सध्या सुरू आहे. ४०४ खाटांच्या या रुग्णालयाचे सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये कायापालट करण्यात येणार आहे.अतिरिक्त पालिका आयुक्त (पश्चिम उपनगर) डॉ.विपीन शर्मा यांनी नुकतीच या कामाची पाहणी करून नूतनीकरणाचे काम वेगाने करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या.

सुमारे ३०१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असलेल्या या प्रकल्पांतर्गत ३२५ नव्या खाटांचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी अत्याधुनिक असे ऑन्कॉलॉजी, न्यूरॉलॉजी, कार्डिओलॉजी, लिव्हर अँड किडनी केअर सेंटर अशा सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. रुग्णालयाच्या इमारतीचे मजले वाढवण्याचादेखील प्रस्ताव विचाराधीन आहे. याप्रसंगी शर्मा यांनी रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभाग, अतिदक्षता विभाग आणि शस्त्रक्रिया विभागांना भेट दिली. तसेच रुग्णांशी संवादही साधला.

# इचलकरंजीतील इंदिरा गांधी रुग्णालयाचे श्रेणीवर्धन होणार



■ मुंबई

**कोल्हापूर** जिल्ह्यातील इचलकरंजी येथील इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयाचे ३०० खाटांच्या रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत शासन सकारात्मक असून अत्याधुनिक आरोग्य सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. रुग्णालयात सिटी स्कॅन, एमआरआय, रक्तपेढी, प्रशिक्षण केंद्र लवकरच सुरू करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

मुंबई येथील आरोग्य सेवा आयुक्तालयात आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत इंदिरा गांधी रुग्णालयाच्या कामकाज व सोयीसुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस आमदार राहुल आवाडे, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, शहरी अभियान आयुक्त सुनील भोकरे तसेच आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, कोल्हापूर परिमंडळाचे आरोग्य उपसंचालक डॉ. दिलीप माने उपस्थित होते. यावेळी आरोग्यमंत्र्यांनी महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत या रुग्णालयात जास्तीत जास्त शस्त्रक्रिया करण्यावर भर देण्याचे निर्देश दिले. आमदार राहुल आवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना प्रभावीपणे राबवण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

# एसटीचे एनसीएमसी कार्ड जास्त दराने विक्री केल्यास परवाना रद्द

■ मुंबई

**एसटी** महामंडळाच्या 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड विक्रीत गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारीनंतर राज्य सरकारने कडक पावले उचलली आहेत. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी अधिकृत दरापेक्षा जास्त पैसे घेणाऱ्या विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यभरात सुमारे ३,००० हून अधिक विक्रेत्यांमार्फत कार्ड वितरण सुरू असताना काही ठिकाणी प्रवाशांकडून जादा दर आकारला जात असल्याचे समोर आले होते. यानंतर प्रशासनाने तातडीने कारवाई करत काही विक्रेत्यांचे परवाने रद्द केले आहेत. नवीन एनसीएमसी कार्डसाठी १९९ रुपये, तर जुन्या स्मार्ट कार्डधारकांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. मात्र, यापेक्षा जास्त पैसे आकारणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, सवलतींचे वितरण अधिक पारदर्शक आणि डिजिटल करण्यासाठी एनसीएमसी प्रणाली लागू करण्यात आली असून, लवकरच सर्व सवलतधारकांसाठी हे कार्ड वापरणे अनिवार्य केले जाणार आहे.

# सिंहगडावर पर्यटक दरीत कोसळला! थरारक बचाव

■ पुणे

**पुण्यातील** पर्यटनस्थळ सिंहगड किल्ल्यावर फिरण्यासाठी गेलेला योगेश शितोळे हा पर्यटक पाय घसरून सुमारे ७० फूट खोल दरीत कोसळला. मात्र बचाव पथकाच्या वेळीच आणि धाडसी कारवाईमुळे त्याचा जीव वाचवण्यात यश मिळाले. या अपघातात योगेश शितोळे यांना किरकोळ दुखापत झाली असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. वेळीच मिळालेल्या मदतीमुळे त्यांचा जीव वाचला.

दरीत कोसळल्यानंतर योगेश शितोळे हे दरीतील एका अवघड ठिकाणी अडकून राहिले. तो अधिक खोल भाग नसल्यामुळे मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी तात्काळ प्रशासनाला कळवले. हवेली पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. रात्रीचा अंधार असूनही बचाव पथकाने दोरखंडाच्या स-हाय्याने १५० फूट खाली उतरून शोधमोहीम करत पर्यटकाला वाचवले.

# नागरिकांना मोबदला न देता जमिनीच्या हक्कापासून वंचित ठेवता येणार नाही

## सिडको, राज्य सरकारला दणका

■ मुंबई

**कायदेशीर** प्रक्रिया पूर्ण न करता आणि मोबदला न देता नागरिकांना त्यांच्या जमिनीच्या हक्कापासून वंचित ठेवता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा देत उच्च न्यायालयाने आज नवी मुंबईतील जमीन संपादनाच्या एका प्रकरणात सिडको आणि राज्य सरकारला दणका दिला. न्या. मनीष पितळे व न्या. श्रीराम शिरसाट यांच्या खंडपीठाने सरकार आणि सिडकोला २०१३ च्या नवीन कायद्यानुसार भूसंपादनाची प्रक्रिया तत्काळ सुरू करण्याचे आदेश दिले.

नवी मुंबई शहराच्या उभारणीसाठी २४ सप्टेंबर १९८६ रोजी तत्कालीन भूसंपादन कायदा, १८९४ च्या कलम ४ अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील करावे गावातील विविध जमिनी अधिग्रहित करण्यासाठी नोटीस काढण्यात आली होती. त्यात सर्वे क्रमांक १०६/६ मधील याचिकाकर्त्याच्या जमिनीचाही समावेश होता. ३१ ऑगस्ट १९८९ रोजी जमिनीचा मोबदला ठरवण्यासाठी निवाडा जाहीर करण्यात आला. मात्र, इतर जमिनींचा मोबदला ठरवला गेला असताना याचिकाकर्त्याच्या जमिनीचे मूल्यमापन झाले नाही आणि मोबदलाही निश्चित केला गेला नाही. त्याविरोधात रोशन तांडेल यांनी ॲड. सचिन पुंडे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

या याचिकेवर सविस्तर सुनावणी घेत खंडपीठाने ६ एप्रिलला निकाल राखून ठेवला होता. तो निकाल आज जाहीर केला. प्रशासनाने विलंब आणि निष्काळजीपणाचे कारण पुढे करून याचिकाकर्त्याचा हक्क नाकारण्याचा प्रयत्न केला होता. प्रशासनाचा तो प्रयत्न न्यायालयाने हाणून पाडला. योग्य कायदेशीर प्रक्रिया व मोबदला न देता जमीन संपादन करणे बेकायदेशीर आहे, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने सिडको आणि सरकारला २०१३ च्या नवीन कायद्यानुसार नव्याने भूसंपादन व भरपाईची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

# प्रसिद्ध तामिळ अभिनेत्याचा भीषण कार अपघातात मृत्यू




■ तिरुवनंतपुरम

**भरधाव** कार एका ट्रकला जोरात धडकून झालेल्या भीषण अपघातात प्रसिद्ध अभिनेते संतोष नायर यांचा मृत्यू झाला, तर त्याची पत्नी गंभीर जखमी झाली. हा भीषण अपघात केरळमधील पाथानमथिट्टा शहरामधील एनाथजवळ झाला.

अपघातानंतर संतोष आणि त्यांच्या पत्नीला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू होते. ते या अपघातामधून बचावल्याने ते लवकरच बरे होऊन परततील असे वाटत असतानाच अचानक त्यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. त्यांची पत्नी राजलक्ष्मी गंभीर जखमी झाली असून तिला अडूर येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. संतोष नायर यांनी १९८२ मध्ये 'इथू नांगलुडे कथा' या चित्रपटाद्वारे चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते. त्यांनी १०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले होते.

# नवाकाळ शब्दकोडे–१५९८



**आडवे शब्द –**

१. तालेवार, बडे प्रस्थ ४. सैन्याला पाठवलेली सामग्री ६. असफल ९. पाषाण ११. प्रेमात पडलेला, लुब्ध १२. परिणाम, फळ १३. हरिणाची एक जात १४. कुटुंबाची धुरा सांभाळणारा १६. पवित्र १८. नवऱ्याचा भाऊ १९. कचखाऊ २२. निवडणुकीत आपले कर्तव्य २४. डोंगराचा कडा २६. निधन २७. लाट २९. उदर ३०. वर्ष, संवत्सर ३१. आशा, उत्साह, उभारी ३२. धष्टपुष्ट ३४. बंगाली लोकांची देवी ३५. मागे हटणे ३६. सरकारी देणे, तात्पर्य, कामातील राम ३८. गायब ४१. नक्की, नियत ४३. मद, उन्मत्तपणा, मस्तवालपणा ४४. नकारात्मक सूर ४६. समर्थन ४९. थांगपत्ता ५१. कंडू ५२. दुष्ट बेत ५३. दिशाभूल करणारे, अर्धवट खरे असलेले विधान ५४. अल्प ५५. पोळीचा लहान प्रकार ५७. दिमाख, ऐट ५८. वेल ५९. जावई ६०. परीट ६१. उद्योग व्यवसाय ६२. जादू, मायाजाल ६४. बिजली ६५. करवंटी ६७. प्रयोजन ६९. विष्णुची पत्नी ७१. शंका, संशय ७२. शह देणे, कुरघोडी ७४. अर्धी ओंजळ ७६. पार्वती ८०. लोभ ८४. पुष्कळ, अनेक ८५. नात्यातला कनिष्ठ ८७. मारूतीचे हिंदी स्तोत्र ८९. तान, आलाप ९०. सखोल माहिती असलेला, माहीतगार ९२. पूर्वपरवानगीने घेतलेली सुट्टी ९३. द्रवपदार्थ थंड होताना त्यावर येणारा पापुद्रा, मलई ९४. मालीश, मसाज ९६. ढोंग ९७. हिंदीत नमस्कार ९९. उन्हाळ्यात वापरले जाणारे कपडे १००. पिकावरील कीड मारणारी औषधे १०१. सत्ताविसावे नक्षत्र १०२. लोचन

**उभे शब्द –**

१. 'मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश....' (चित्रपट-महानंदा) २. मनाविरुद्ध, सक्तीने ३. मारूती ४. हिंसाचार ५. गाडणे, पुरणे ६. आसवे ढाळणे ७. संन्यासी ८. पत्कर ९. अपशब्दांचा भडिमार १०. लहर, तरंग, हुक्की १५. आवेश, जोर, उत्साह १७. न्यायालयात कायदेशीर बाजू मांडणारा १८. केविलवाणा, बापडा १९. हिंदीत प्रसंग २०. लहान २१. मनाची अस्वस्थता, उलघाल २२. थकवा, अनुत्साह, ग्लानी २३. राजाराणीची बटीक २४. मुक्तता २५. मार्गातून बाजूला करणे, निर्मूलन याअर्थी वापरला जाणारा शब्दप्रयोग २८. मारला गेलेला ३१. दिरंगाई ३३. व्यवस्थित ३७. युरोपिय देशांचा दिशेच्या आधारे उल्लेख ३८. धातूची कांब ३९. शस्त्राची मूठ ४०. राखणदार ४२. टिकाव ४३. महिना ४५. बेसावध ४७. पौर्णिमा ४८. हाकलून देणे, डच्चू ५०. कायमचे गाडून टाकणे ५१. शहानिनशा, खात्री करणे ५५. मोफत ५६. चोळीचा प्रकार ६३. खूप ६६. त्वचेचा रंग ६८. घृत ७०. वस्तू, जिन्नस ७३. तृषित ७५. गांधीजींचा गुजरातमधील आश्रम या नदीकाठी आहे ७७. लेखन ७८. कितीतरी ७९. धाकटी बहीण ८१. वेखंड ८२. ज्ञानेश्वरांनी देवाला मागितलेला वर ८३. सोपे ८५. शस्त्राची तीक्ष्ण कड, प्रवाह ८६. प्रदेश ८७. घोड्याचे आवडते खाणे, चणे ८८. ओली पिठीसाखर ९०. सीता ९१. कष्टांना सरावलेला, कणखर ९५. कुळ ९७. दक्षकन्या ९८. चित्त, अंतःकरण •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५९७ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. पद ३. सकवार ६. विळ्याभोपळ्याचे सख्य ११. गोरखचिंच १३. डगला १५. टच १६. हल १७. मच्छर १८. जीत २०. वपन २२. कासरा २५. जहाल २७. उगवती २८. दरा ३०. साचा ३१. नभ ३२. गोंगाट ३२अ. चक्षु ३३. बलराम ३६. विराट ३८. गुहा ३९. वैताग ४०. तबक ४१. यात्रिक ४२. वाढ ४३. बोरू ४४. बोध ४५. बदल ४६. लघळ ४८. टोल ४९. शेज ५०. दंग ५१. बकुळ ५३. नीज ५५. घेर ५७. वातड ६०. बाणेदार ६१. वण ६२. रास ६३. उत्तररात्र ६४. सीता ६५. डालडा ६८. दीप ७०. जाहीर ७२. ओळख ७४. वनराई ७६. हरळी ७८. हाक ८०. पटकन ८२. मद ८३. माग ८४. खाट ८५. निधन ८६. पर ८७. ताकदवान ८९. गाडीवान ९०. पट ९१. तरू ९२. गळ ९३. न्यूनगंड ९४. घेरा ९५. मल्ल ९६. झुंड ९९. स्थायी १००. जरा १०२. खराब १०४. धग १०५. पदरव १०६. छान १०७. पायमल्ली १०८. गडगडाट

**उभे शब्द :** १. परम दीनदयाळा नीरसी मोहमाया २. स्वैर ३. सचिंत ४. कच ५. रड ६. विलाप ७. भोट ८. पचका ९. चेहरा १०. नाल ११. गोरज १२. खजील १४. गवती चहा १९. लगट २१. नद २३. सदरा २४. वैचारिक २६. हावरा २७. उगाच २९. राबता ३४. लगबग ३५. मतलब ३६. विकल ३७. टवाळ ३८. गुरू ३९. वैध ४३. बोलघेवडा ४४. बोजवारा ४७. घराणेशाही ५०. दंड ५२. कुचराई ५४. ओरडा ५६. रण ५८. तसदी ५९. चित्तथरारक ६६. लक्ष्य ६७. कळप ६९. पवन ७०. जाळी ७१. रहाटगाडगे ७३. खटपट ७५. सदन ७७. रग ७९. इंधन ८१. कर ८२. मवाळ ८५. निवासस्थान ८७. तारू ८७अ. दगड ८८. दानशूर ९०. पराजय ९१. तल्लख ९६. झुंबड ९७. झेंगट ९८. श्राप १०१. राम १०३. राग १०४. धडा

## अजित पवार अपघातप्रकरणी अघोरी पूजेबाबत चौकशी व्हावी

**अमोल मिटकरी यांची मागणी**

■ मुंबई

**राष्ट्रवादी** अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी आज राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते आणि खरात प्रकरणातील एसआयटी प्रमुख तेजस्विनी सातपुते यांची भेट घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत निवेदन सादर केले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य उघड करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

मिटकरी यांच्या दाव्यानुसार, अजित पवार यांच्या विमान घटनेपूर्वी काही ठिकाणी संशयास्पद 'अघोरी पूजा' झाल्याची माहिती आहे. या पूजेचा संबंध अटकेत असलेल्या भोंदू बाबा अशोक खरात आणि त्याच्या अनुयायांशी असू शकतो. काठेवाडी खताळ पट्टा परिसर, विद्या प्रतिष्ठान परिसर तसेच सहयोग आणि देवगिरी बंगल्याभोवती अशा प्रकारच्या घटनांचे काही व्हिडिओ फुटेज उपलब्ध आहेत. हा प्रकार अपघात असेल तर तसे स्पष्ट व्हावे, पण जर यामागे घातपात किंवा अघोरी कृत्याचा संबंध असेल, तर त्याची चौकशी व्हावी. त्यांनी संबंधित पुरावे आणि व्हिडिओ लवकरच तपास यंत्रणेला सुपूर्द करणार आहे. दरम्यान, भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या तपासासाठी राज्य सरकारने तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक स्थापन केले आहे.



## सुनेत्रा पवारांचा राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा

■ नवी दिल्ली

**उपमुख्यमंत्री** सुनेत्रा पवार यांनी आज राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. दिल्लीत राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन त्यांनी आपला राजीनामा सादर केला. यावेळी त्यांचा मुलगा खा. पार्थ पवार हेही दिल्लीत उपस्थित होते. नुकत्याच झालेल्या बारामती पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी २ लाख १८ हजार ९६९ मते मिळवत ऐतिहासिक विजय नोंदवला. आमदार बनल्याने त्यांनी आता खासदारकीचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या राजीनाम्यानंतर राज्यसभेतील रिक्त जागेसाठी कोणाची वर्णी लागणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. संभाव्य नावांमध्ये जय पवार, छगन भुजबळ आणि नितीन पाटील यांची चर्चा सुरू आहे. यातील छगन भुजबळ यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा होत आहे. यापूर्वी त्यांना राज्यसभेवर जाण्याची इच्छा होती, मात्र त्यावेळी त्यांना संधी न मिळाल्याने ते नाराज असल्याचेही बोलले जात होते.

## राज्यात शाळेची फी नियंत्रित करण्यासाठी नव्या समित्या

पान १ वरून

क्रीडा विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, कोल्हापूर, नाशिक, लातूर आणि अमरावती येथे प्रस्तावित नव्या विभागीय शुल्क नियामक समितीच्या अतिरिक्त जबाबदाऱ्या मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील विद्यमान समित्यांना सोपवण्यात आल्या आहेत. या समितीत एक निवृत्त उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि शिक्षण उपसंचालक यांचा समावेश असेल.

विभागीय शुल्क नियामक समित्या या खासगी अनुदान न घेणाऱ्या शाळांनी प्रस्तावित केलेल्या शुल्क संरचनेचा आढावा घेणे आणि मंजुरी देणे यासाठी जबाबदार असतील. त्या शुल्क संरचना कायद्याचे पालन करतील आणि मनमानी वाढ लादली जात नाही याची खात्री करतील. तसेच या समित्या पालकांच्या तक्रारींसाठी निवारण मंच म्हणूनही काम करतात.

अधिकाऱ्यांनी या समित्यांची माहिती देताना सांगितले की, ही समिती त्यांच्याकडे आलेल्या तक्रारी ऐकेल किंवा तपासणीदरम्यान आढळलेल्या कोणत्याही विसंगतींवर कारवाई करेल. हा निर्णय १८ मार्चच्या अधिसूचनेनंतर घेण्यात आला आहे. कोल्हापूर, नाशिक, लातूर आणि अमरावती येथे अशाच समित्यांची स्थापना विचाराधीन आहे. या निर्णयामुळे शाळा शुल्क नियंत्रण आणि पालकांच्या तक्रारींचे निराकरण प्रशासकीय विलंबाशिवाय सातत्याने होईल. सर्व विभागीय समित्या पूर्णपणे कार्यान्वित होईपर्यंत महाराष्ट्रभर शुल्क नियमन कायद्याची एकसमान अंमलबजावणी राखणे हा उद्देश आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

Sealed Item Rate Tenders are invited from Experienced, Competent & Resourceful Contractors for Structural & Civil Repairs, Waterproofing, Plumbing & Painting works of buildings.

**TATVA CO. OP. HSG. SOC. LTD.**

Near W. E. Highway, Magathane, Borivali (East), Mumbai – 400066.

Tenders shall be collected from Consultant & Society office payment of Rs. 15,000/- + GST Applicable by Cheque/Demand draft (non-refundable) from 07/05/2026 to 15/05/2026 between 10.00 am. To 06.00 p.m. Submission to Society office on 16/05/2026 (Saturday) between 10.00 a.m. to 04.00 p.m.

**ADVICE CONSULTANTS**

A/303, Grace Chambers Andheri Kurla Road, Chakala, Near Gurudwara, Andheri East, Mumbai - 400093.

Cell:- 9321177022 /9320794553

## 'वंदे मातरम्'चा अपमान केल्यास ३ वर्षांपर्यंत कारावासाची तरतूद

■ नवी दिल्ली

**राष्ट्रीय** गीत 'वंदे मातरम्'च्या अपमानाविरोधात केंद्र सरकारने केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंधक कायदा, १९७१ या कायद्यात सुधारणा करून मंजुरी दिली आहे. यानुसार आता 'वंदे मातरम्'चा अपमान केल्यास गुन्हा ठरून दोषी व्यक्तीस ३ वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा करण्यात येणार आहे. या सुधारणेनुसार, 'वंदे मातरम्' गाताना अडथळा निर्माण करणे, त्याचा अवमान करणे किंवा अनादर दाखवणे यासाठी दोषींना ३ वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकते. याआधी या कायद्यात केवळ राष्ट्रगीत 'जन गण मन', राष्ट्रध्वज आणि भारतीय राज्यघटनेच्या अवमानासंदर्भातच शिक्षा निश्चित होती. आता त्यात राष्ट्रीय गीताचाही समावेश झाला आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने यापूर्वी 'वंदे मातरम्' संदर्भात काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या.

## बंगाल निकालानंतर हिंसाचार तृणमूल कार्यालयावर बुलडोझर

पान १ वरून

चालवून ते पाडले. आसपासच्या दुकानांचेही नुकसान केले. तृणमूल काँग्रेसने या घटनेचा व्हिडिओ एक्सवर शेअर करत लिहिले की, भाजपाचे 'परिवर्तन' आले असून, ते बुलडोझरसह आले आहे. आसनसोलच्या कोर्ट मोड भागातील तृणमूल काँग्रेसच्या कार्यालयातही आग लागली. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तपासादरम्यान घटनास्थळावरून बॉम्बने भरलेली एक पिशवीही सापडली. आमतला येथे तृणमूल काँग्रेसचे महासचिव अभिषेक बॅनर्जी यांच्या कार्यालयात तोडफोड करण्यात आली. तृणमूल काँग्रेसचा आरोप आहे की, भाजपा समर्थकांनी दगडफेक करून तृणमूलचे पोस्टर-बॅनर फाडले. मुर्शिदाबाद जिल्ह्यातील जियागंज येथे लेनिन यांचा पुतळा तोडण्यात आला. उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील संदेशखालीच्या बामनघेरी भागात काल रात्री गस्त घालणाऱ्या पोलीस आणि केंद्रीय दलांवर हल्ला झाला. आंदोलकांनी गोळीबार केला. त्यात पाच सुरक्षाकर्मी जखमी झाले. जखमींमध्ये नाजाट पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, एक कॉन्स्टेबल, एक महिला पोलीस आणि केंद्रीय दलांचे दोन जवान यांचा समावेश आहे. पोलिसांनी हिंसक घटनांमधील ८० जणांना अटक केली आहे.

तृणमूलच्या प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे कोलकातामधील आणि त्यांचे भाचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांचे निवासस्थान आणि तृणमूल काँग्रेसचे मुख्यालय येथील अतिरिक्त पोलीस बंदोबस्त आज हटवण्यात आला आहे. आज या तिन्ही ठिकाणी एकही पोलीस कर्मचारी उपस्थित नव्हता. ममता यांच्या निवासस्थानाबाहेरील बॅरिकेडही हटवण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, बंगालमध्ये भाजपाचा विजय होताच अनेक दुकानदारांनी आपली दुकाने भगव्या रंगाने रंगवायला सुरुवात केली आहे. दुकानदार दुकानावर जय श्रीराम लिहिलेले भगवे झेंडेही लावत आहेत. अनेक ठिकाणांची नावे बदलणे सुरू झाले आहे. बारासातमधील ऐतिहासिक 'सिराज उद्याना'चे नाव बदलून 'शिवाजी उद्यान' ठेवण्यात आले आहे, तर 'मस्जिदबारी रोड'च्या कमानीचे आता 'नेताजीपल्ली रोड' असे नामकरण करण्यात आले आहे.

## पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन एकरी १ कोटी ६१ लाखांचा दर

पान १ वरून - सदस्याला नोकरीची संधी दिली जाणार आहे. तसेच, जमिनीवरील विहिरी, बोअरवेल, घरे, शेड, झाडे आदींचे स्वतंत्र मूल्यांकन करून त्यावर दुप्पट मोबदला दिला जाणार आहे. आंबा, चिंच, सीताफळ यांसारख्या फळझाडांसाठीही बाजारभावाच्या दुप्पट रक्कम देण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी डूडी पुढे म्हणाले की, १० जूननंतर उर्वरित जमीन सक्तीने संपादित करण्यात येईल. तसेच, या प्रकरणात दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेतले जातील. महिला बचत गटांना विमानतळ परिसरात व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून देण्याचाही निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

**महावितरण**

**ई–निविदा सुचना**

म.रा.वि.वि.कंपनी विटा विभागीय कार्यालय अंतर्गत असणा-या पाच उपविभागामध्ये उच्चदाब वाहिनी (HT), लघुदाब वाहिनी (LT) व वितरण रोहित्र केंद्र (DTC) यांच्या प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी (Preventive Maintenance) निविदा रक्कम रु.४८.०० लाख एका वर्षांच्या (२०२६-२७) करारासाठी स्थानिक परवानधारक विदयुत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ठ (Empanelment) अंतर्गत नियुक्ती करणेसाठी ई-निविदा EE/VT/PM/T-०१/२६-२७ म.रा.वि.वि.कंपनी मर्या, च्या https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदा विक्रीसाठी दि.०७.०५.२०२६ पासून दि.१७.०५.२०२६ वेळ १७:०० पर्यंत उपलब्ध राहतील. तरी संबंधितांनी नोंद घ्यावी.

कार्यालयीन दुरध्वनी क्र.७८७५९६३२५७

PRO/KOPZ/47/26-27

## तामिळनाडूत थलापती विजय आज मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार

पान १ वरून

सर्वाधिक १०८ जागा मिळवून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. बहुमतासाठी ११८ आमदारांची आवश्यकता आहे. म्हणजे टीव्हीकेला बहुमतासाठी १० आमदारांची गरज आहे.५ आमदार असलेल्या काँग्रेसने टीव्हीकेला पाठिंबा देण्याची तयारी दर्शवली आहे. यासाठी काँग्रेसने द्रमुकसोबतची आपली अनेक वर्षांची युती तोडली. काँग्रेसने विजय यांना पाठिंबा देताना धर्मनिरपेक्ष सरकारसाठी पाठिंबा देत आहोत, असे म्हटले आहे. दुसरीकडे विजयला पाठिंबा देण्यासाठी अण्णा द्रमुकचे आमदारही उत्सुक आहेत. अण्णा द्रमुकच्या ३० आमदारांनी, टीव्हीकेला पाठिंबा द्या. नाहीतर पक्षातून बाहेर पडू, असा इशाराच दिला आहे. तामिळनाडू विधानसभेचा कार्यकाळ १० मे रोजी संपत आहे. त्याआधी नव्या सरकारची स्थापना होणे आवश्यक आहे. कायदेतज्ज्ञांच्या मते १० मे पर्यंत जर विजय यांच्या पक्षाला बहुमताचा ११८ चा आकडा गाठता आला नाही तरी विजय हे सरकार स्थापनेचा दावा करू शकतात. मात्र सरकार स्थापन केल्यानंतर १५ दिवसांच्या आत त्यांना बहुमत सिद्ध करावे लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयातील वकील कृष्णमूर्ती यांनी एका वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, १० मेपर्यंत नवे सरकार स्थापन होणे अनिवार्य आहे.टीव्हीकेकडे बहुमताचा आकडा गाठण्यासाठी फारच कमी दिवस शिल्लक राहिले आहेत.अशा परिस्थितीत आणखी एका घटनात्मक पर्यायाचा वापर केला जाऊ शकतो. त्यानुसार १० मे रोजी विजय एकटेच मुख्यमंत्रिपदाची शपथ घेऊ शकतील. त्यानंतर त्यांना बहुमत सिध्द करण्यासाठी १५ दिवसांचा अवधी मिळू शकेल. काही राजकीय विश्लेषकांच्या मते, असे काही करण्याची विजय यांना गरज भासणार नाही. कारण द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांच्या व्यतिरिक्त अन्य छोट्या पक्षांचे मिळून ११ हून अधिक आमदार आहेत. यामध्ये काँग्रेसचे ५, विदुथलाई चिरुथाईगल कच्ची (व्हीसीके) पक्षाचे २, कम्युनिस्ट पक्षांचे ४ आणि डीएमडीकेचा १ आमदाराचा समावेश आहे. त्याशिवाय पीएमके आणि पीएमएमके हे पक्षदेखील टीव्हीकेला पाठिंबा देऊ शकतील. त्यामुळे बहुमताचा आकडा गाठणे विजय यांना फारसे कठीण होणार नाही.

## महाराष्ट्रातील सरकारी कर्मचाऱ्यांवर हिंदी परीक्षा सक्ती

पान १ वरून

घेतला जाईल. गरज असल्यास परीक्षा सुरू ठेवली जाईल, अन्यथा ती रद्द करण्याचा निर्णय घेतला जाईल. ही हिंदी भाषा परीक्षा १९७६ च्या नियमावलीनुसार घेतली जात आहे. त्या नियमावलीत मराठी भाषा विभागाअंतर्गत हिंदी परीक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे. सरकारच्या या भूमिकेचे दीपक पवार यांनी स्वागत केले आहे. ते म्हणाले की, मराठी अभ्यास केंद्राच्या पुढाकाराला यश आले. मी सरकारच्या राजपत्रित अधिकारी आणि अराजपत्रित कर्मचाऱ्यांना हिंदीची परीक्षा देण्याच्या सक्तीविरोधात पोस्ट टाकली. ही परीक्षा कायमस्वरूपी रद्द करावी अन्यथा परिपत्रकाची होळी करण्याची मराठी अभ्यास केंद्राची भूमिका आहे. परीक्षा कायमस्वरूपी रद्द करण्याचीच गरज आहे. ते जेव्हा घडेल तेव्हा मंत्रिमहोदयांचे शंभर टक्के अभिनंदन करता येईल. हिंदीच्या देशांतर्गत वसाहतवादाचा बिमोड करण्यासाठी कायम सावध राहण्याची गरज आहे. यापुढची लढाई हिंदी राष्ट्रभाषा प्रचार समिती नावाचे थोतांड महाराष्ट्रातून कायमचे हद्दपार करण्याची असणार आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत १) श्रीमती. चौथुबाई हिरामण कोळी २) श्रीमती. सुमती रामकृष्ण कोळी ३) श्री. चंद्रकांत हरिभाऊ कोळी ४) श्रीमती. आनंदी जगन कोळी ५) श्रीमती. जयश्री पांडुरंग कोळी यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे सदरहू मिळकत असे उल्लेखलीले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे–तरघर, ता– पनवेल, जिल्हा– रायगड

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हेआर पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २२ | ४ | ०७०.०० पो.ख. ०.००.०० | १४.०६ |
| | | एकूण ०७०.०० | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकती निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकत संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०७/०५/२०२६

सही/–

**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**

२०३, मोहिनी पार्टी,

नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड

पिन कोड– ४००७०२

मोबाईल नं. ७६६६०१०२९३

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

वृक्ष प्राधिकरण

**-जाहिर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ ( ३ ) (क) मधील तरतुदी नुसार परिमंडळ -०२ मधील 'डी' विभागातील ०१ प्रस्ताव, म्हणजेच एकूण ०१ प्रस्ताव, म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण/वृक्ष प्राधिकरण समिती यांचा मंजुरी प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुनर्रोपित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या www.mcgm.Gov.in संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे. ११०१ (डी)

उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय,
पेंग्विन इमारत, २ रा माळा,
वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई - ४०००२७.
दुरध्वनी क्र. २३७४२१६२ Email - sg.gardens@mcgm.gov.in


सही/-
**उद्यान अधीक्षक**
**व वृक्ष अधिकारी**

पीआरओ/२६२/जाहि./२०२६-२७

**स्वमर्जीने औषधोपचार करू नका.**

नवाकाळ
• मुंबई । गुरुवार ७ मे, २०२६ • पान -८

## स्थलांतर करणाऱ्या देशांच्या यादीत भारत 'टॉप टेन'मध्ये



**वॉशिंग्टन -** जगभरात सर्वाधिक स्थलांतर केल्या जाणाऱ्या पहिल्या दहा देशांमध्ये भारताचा समावेश झाला आहे. संयुक्त राष्ट्र संघातील आंतरराष्ट्रीय स्थलांतर संस्था (आयओएम)ने हे सर्वेक्षण केले असून, कोणत्या देशातून कोणत्या देशात सर्वाधिक स्थलांतर केले जाते याचे सर्वेक्षण करून असे दहा स्थलांतर मार्ग निश्चित केले आहे. त्यामध्ये भारत ते संयुक्त अरब अमिराती आणि भारत ते अमेरिका या दोन स्थलांतर मार्गांचा समावेश आहे. २०२४ च्या मध्यापर्यंत जागतिक स्तरावर सुमारे ३०४ दशलक्ष लोकांनी आपला मायदेश सोडून अन्य देशांत स्थलांतर केले. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेने स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाणही सातत्याने वाढत चालले आहे. १९९० मध्ये हे प्रमाण जगाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत २.९ टक्के होते. ते २०२४ पर्यंत ३.७ टक्के झाले आहे, असे हा अहवाल सांगतो. सर्वाधिक स्थलांतर होणाऱ्या मार्गांमध्ये मेक्सिको ते अमेरिका हा मार्ग २०२४ मध्येही अव्वल स्थानी आहे.

## सुप्रीम कोर्टातील न्यायाधीशांची संख्या चारने वाढवून ३७ करणार

**केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी**

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** मंत्रिमंडळाने सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ३३ वरून ३७ करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. सरकार संसदच्या पुढील अधिवेशनात यासंबंधीचे विधेयक मांडणार आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, सध्या सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीशांसह ३३ न्यायाधीशांची संख्या निश्चित आहे. सरकार यात आणखी चार नवीन न्यायाधीशांची भर घालू इच्छिते. यासाठी संसदेच्या पुढील अधिवेशनात विधेयक आणले जाईल.

मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर १९५६च्या कायद्यात दुरुस्ती केली जाईल. संविधानाच्या कलम १२४(१) नुसार सर्वोच्च न्यायालयातील



न्यायाधीशांची संख्या वाढवण्याचा अधिकार संसदेकडे आहे. कायदा लागू झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे कॉलेजियम (न्यायवृंद) नवीन न्यायाधीशांची नावे सरकारकडे पाठवेल. यापूर्वी २०१९मध्ये सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ३१ वरून ३३ करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीशांशिवाय फक्त १० न्यायाधीशांची व्यवस्था होती. सध्या सर्वोच्च न्यायालयात दोन पदे रिक्त आहेत. न्या. बी. आर. गवई नोव्हेंबर २०२५मध्ये आणि न्या. राजेश बिंदल एप्रिल२०२६मध्ये निवृत्त झाले होते. येत्या काही महिन्यांत आणखी तीन पदे रिक्त होणार आहेत. न्या. जे.के. माहेश्वरी आणि न्या. पंकज मित्तल जून २०२६ मध्ये निवृत्त होतील, तर न्यायमूर्ती संजय करोल ऑगस्ट २०२६ मध्ये निवृत्त होतील.

## एसआरपीएफ भरतीतील गोंधळानंतर प्रक्रिया स्थगित

■ पुणे

**राज्य** राखीव पोलीस दल (एसआरपीएफ) गट क्रमांक ५ अंतर्गत घेण्यात आलेल्या भरतीच्या लेखी परीक्षेत गंभीर अनियमितता उघडकीस आल्यानंतर संपूर्ण भरती प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश पोलीस उपमहानिरीक्षकांनी दिले आहेत.

या परीक्षेतील तब्बल १०० पैकी ८५ प्रश्न एका खासगी प्रकाशकाच्या पुस्तकातून जशास तसे घेतल्याचा आरोप आहे. यामुळे विद्यार्थ्यांनी व विरोधकांनी तीव्र संताप व्यक्त केला. त्यानंतर पोलीस उपमहानिरीक्षकांनी तातडीने दखल घेत चौकशीचे आदेश दिले. तसेच, चौकशी अहवाल येईपर्यंत एसआरपीएफ गट क्रमांक ५ ची भरती प्रक्रिया स्थगित केली. आता संबंधित प्रश्नपत्रिका तयार करण्यातील त्रुटी कशा घडल्या याचा सखोल तपास केला जाणार आहे.

## आठवीच्या पुस्तकातून मराठा नकाशा वगळला! भोसले राजघराण्याची याचिका

■ मुंबई

**इयत्ता** आठवीच्या समाजशास्त्र विषयाच्या पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा हटवण्याचा वाद उच्च न्यायालयात पोहोचला आहे. मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा हटवण्याच्या 'एनसीईआरटी'च्या निर्णयाला मराठा राजघराण्यांच्या वंशजांनी जनहित याचिकेद्वारे आव्हान दिले आहे. या याचिकेवर लवकरच मुख्य न्यायमूर्तींच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर सुनावणी होण्याची शक्यता आहे.

नागपूरचे राजे मुधोजीराजे अजितसिंगराव भोसले यांच्यासह अन्य नऊ जणांनी

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

ॲड. आशिष गायकवाड यांच्या मार्फत उच्च न्यायालयात धाव घेऊन जनहित याचिका दाखल केली आहे. एनसीईआरटीने इयत्ता आठवीच्या पुस्तकातील 'आकृती ३.११' हा नकाशा हटवला आहे. हा नकाशा इ.स. १७५९ मधील मराठा साम्राज्याची व्याप्ती दर्शवतो. त्यात मराठ्यांचे साम्राज्य तंजावरपासून पेशावरपर्यंत पसरल्याचे दिसते. राजस्थानच्या काही माजी राजघराण्यांच्या विरोधानंतर ऑक्टोबर २०२५ ते एप्रिल २०२६ या काळात हिंदी, उर्दू आणि इंग्रजी आवृत्त्यांमधून हा नकाशा वगळण्यात आला आहे, असे जनहित याचिकेतून न्यायालयाच्या निदर्शनास आणले आहे.

## बदलापूर पीडित मुलीची शासनाने शाळेची फी अद्याप भरलीच नाही

■ ठाणे

**बदलापूरमधील** अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणानंतर राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनांची अद्याप पूर्तता झालेली नाही. पीडित चिमुकलीच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलण्याचे आणि कुटुंबाला आर्थिक मदत देण्याचे आश्वासन देऊनही प्रत्यक्षात कोणतीही मदत मिळाली नसल्याची माहिती उघडकीस आली आहे.

दोन वर्षांपूर्वी बदलापूरमधील एका शाळेत चार आणि सहा वर्षांच्या दोन मुलींवर अत्याचार झाल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर राज्यभरात संताप व्यक्त झाला होता. त्यावेळी तत्कालीन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी पीडित मुलींच्या शिक्षणाचा सर्व खर्च शासन उचलेन, तसेच त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत दिली जाईल, असे जाहीर केले होते. मात्र, या आश्वासनांची पूर्तता झालेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. पीडित चिमुकली सध्या दुसऱ्या खासगी शाळेत शिक्षण घेत असून यावर्षी ती पहिली इयत्तेत प्रवेश घेणार आहे. तिची मागील वर्षाची फी सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने भरण्यात आली.

## रुग्णालयांतील खासगीकरणावर मुंबई पालिका प्रशासन ठाम

**भाजपाच्या आमदाराचा प्रस्तावाला विरोध**

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेने शहरातील प्रमुख ८ रुग्णालयांच्या स्वच्छतेसाठी १०१ कोटींचे तीन वर्षांचे कंत्राट देण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. या निर्णयावर पालिका ठाम असून, हा प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरीसाठी मांडला जाणार आहे. भाजपाचे मुलुंडचे आमदार मिहीर कोटेचा यांनी मात्र या प्रस्तावाला विरोध करत या प्रक्रियेत ४५ कोटींचा घोटाळा झाला असल्याचा आरोप केला आहे.

पालिकेच्या मालकीच्या असलेल्या केईएम, सायन, नायर, कूपर, ट्रामा सेंटर, भगवती आणि एम.टी.अग्रवाल या प्रमुख



रुग्णालयांमध्ये साफसफाई आणि कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी खासगी संस्था किंवा कंपन्यांना तीन वर्षांसाठी १०१ कोटी रुपयांचे कंत्राट दिले जाणार आहे. हे कंत्राट प्रति चौरस फूट, प्रति महिना या तत्वावर दिले जाणार आहे. यामध्ये केईएम रुग्णालयाचा स्वच्छता दर प्रति चौरस फूट ६.७८ रुपये निश्चित करण्यात आला आहे. कंत्राट मिळवल्यानंतर ३० दिवसांत प्रत्यक्ष काम सुरू करणे बंधनकारक राहणार आहे. अन्यथा दिवसाला १० हजार रुपये दंड आकारला जाणार आहे. मागील वर्षाचे कंत्राट संपल्यापासून रुग्णालयांमध्ये अस्वच्छता वाढल्याच्या तक्रारी येऊ लागल्याने या प्रस्तावासाठी घाई केली जात आहे.

## नशेत होतो! नसरापूर प्रकरणात आरोपीकडून बचावाचा प्रयत्न

■ पुणे

**भोर** तालुक्यातील नसरापूर येथे ४ वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याच्या प्रकरणाने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील ६५ वर्षीय आरोपीने तपासादरम्यान असा दावा केला आहे की, घटना घडली त्या दिवशी मी नशेत होतो.

तपासाचा भाग म्हणून पुणे ग्रामीण पोलिसांनी आरोपीला मध्यरात्री गुप्तपणे घटनास्थळी नेऊन संपूर्ण घटनाक्रम पुन्हा साकारला. चिमुकलीला कुठून नेले, कुठे अत्याचार झाला आणि पुढे काय घडले, याची तपशीलवार माहिती आरोपीकडून घेतली. ही माहिती आरोपपत्रात समाविष्ट केली जाणार आहे. दरम्यान, ससून रुग्णालयाकडून पीडित मुलीचा प्राथमिक शवविच्छेदन अहवाल पोलिसांना मिळाला आहे. यानुसार, आरोपीने चिमुकलीच्या तोंडात सॉक्स कोंबून अत्याचार केल्याची माहिती आहे. चिमुकलीच्या मृतदेहाची तपासणी ससून रुग्णालयात झाली. त्यानंतर रुग्णालयाच्या न्याय वैद्यकीय शास्त्र विभागात मृतदेहाची इन कॅमेरा तपासणीही करण्यात आली आहे.

## जालंधर आणि अमृतसर बीएसएफ तळांजवळ स्फोट

■ अमृतसर

**पंजाबमध्ये** जालंधर आणि अमृतसर येथील सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) तळांजवळ झालेल्या दोन भीषण स्फोटांमुळे खळबळ उडाली. या दोन्ही घटनांमागे दहशतवादी कट असल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला असून, खलिस्तानी संघटना आणि पाकिस्तानची आयएसआय यांचा सहभाग असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जालंधरमधील बीएसएफ मुख्यालयाजवळील परिसरात पार्क केलेल्या एका स्कूटरमध्ये अचानक स्फोट झाला. स्फोटानंतर स्कूटरने तत्काळ पेट घेतला आणि परिसरात धुराचे लोट पसरले. या घटनेमुळे आसपासच्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.



जालंधर घटनेनंतर काही तासांतच अमृतसरच्या खासा परिसरात बीएसएफ चौकीजवळ दुसरा स्फोट झाला. तपासात मोटारसायकलवरून आलेल्या व्यक्तीने ग्रेनेड फेकल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. हा परिसर आंतरराष्ट्रीय सीमा (अटारी-वाघा) पासून सुमारे १५ किमी अंतरावर असल्याने सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत.

जालंधर स्फोटाच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्कूटरला अचानक आग लागून स्फोट झाल्याचे दिसते. त्यानंतर एक व्यक्ती घटनास्थळावरून पळताना दिसते. दरम्यान जालंधरमधील स्कूटर एका डिलिव्हरी एजंटची असल्याची माहिती आहे. तो नेहमीप्रमाणे बीएसएफ परिसरात पार्सल पोहोचवण्यासाठी आला होता. स्कूटर पार्क केल्यानंतर तो आत गेला असताना स्फोट झाला.

## नवले पूल परिसरात आंदोलनाला बंदी! उल्लंघन केल्यास कारवाई

■ पुणे

**मुंबई-बंगळुरू** बाह्यवळण मार्गावरील नवले पूल परिसरासह शहरातील संवेदनशील ठिकाणी आंदोलन व रास्ता रोको करण्यास बंदी घालण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी जारी केले आहेत. नसरापूर येथे घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ नागरिकांनी शनिवारी २ मे रोजी नवले पूल परिसरात अचानक ठिय्या आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. मुंबई आणि सातारा दिशेकडील वाहतूक खोळंबली असून, दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सुमारे १५ किलोमीटरपर्यंत वाहतूक कोंडी झाल्याने रुग्णवाहिका, प्रवासी आणि मालवाहू वाहने अडकून पडली होती. त्यामुळे आता शहरातील संवेदनशील ठिकाणी आंदोलन व रास्ता रोको करण्यास बंदी घालण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला आहे.

## सायबर फसवणूक पर्दाफाश करणाऱ्या २ भारतीय पत्रकारांना पुलित्झर सन्मान

■ नवी दिल्ली

**सायबर** फसवणूक आणि डिजिटल पाळतीसारख्या गंभीर विषयांचा पर्दाफाश करणाऱ्या भारतीय पत्रकार आनंद आर. के. आणि सुवर्णा शर्मा यांना यंदाच्या पुलित्झर पुरस्कार या प्रतिष्ठेच्या सन्मानाने गौरवण्यात आले आहे. त्यांच्या सखोल आणि प्रभावी शोध पत्रकारितेमुळे जागतिक स्तरावर वाढत चाललेल्या सायबर गुन्हेगारीकडे लक्ष वेधले गेले. 'ट्रॅप्ड' या त्यांच्या विशेष वृत्तांताद्वारे त्यांनी डिजिटल जगातील धोक्यांचे वास्तव समोर आणले.



काल या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. आनंद आणि सुवर्णा यांना 'सचित्र वृत्तांत आणि भाष्य' या श्रेणीत गौरवले. त्यांनी हा सन्मान नताली ओबिको पिअर्सन यांच्यासोबत सामायिक केला. त्यांच्या 'ट्रॅप्ड' या कथेमुळे त्यांना विशेष ओळख मिळाली. हा वृत्तांत एका भारतीय मेंदूविकार तज्ज्ञाच्या अनुभवावर आधारित आहे. या व्यक्तीला डिजिटल पद्धतीने अडकवले होते. त्यातून सायबर फसवणुकीचे जाळे कसे काम करते, हे या वृत्तांतात दाखवण्यात आले आहे. चित्रे आणि शब्दांचा प्रभावी वापर करून ही कहाणी मांडली असून, जगभरात वाढत असलेल्या डिजिटल पाळतीच्या धोक्याकडे लक्ष वेधले.

## भारत-व्हिएतनाम संबंध दृढ १३ महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षरी

■ नवी दिल्ली

**भारत** दौऱ्यावर आलेले व्हिएतनामचे राष्ट्रपती तो लाम व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज हैदराबाद हाऊसमध्ये झालेल्या बैठकीत १३ महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. बैठकीनंतर संयुक्त पत्रकार परिषदेत याबाबत माहिती देण्यात आली.

पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, गेल्या वर्षी भारतातून व्हिएतनामला पाठवलेल्या पवित्र बौद्ध अवशेषांचे दीड कोटीहून अधिक लोकांनी दर्शन घेतले. चंपा सभ्यतेच्या हस्तलिखितांचे डिजिटल जतन करून हा अमूल्य वारसा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवला जाईल. गेल्या दशकात भारत-व्हिएतनाम संबंधांमध्ये सर्वच क्षेत्रांत मोठी प्रगती झाली आहे. द्विपक्षीय व्यापार दुपटीने वाढून १६ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. आता या संबंधांना 'आधुनिक व्यापक धोरणात्मक भागीदारी'च्या नव्या स्तरावर नेण्यात येत आहे. राष्ट्रपती तो लाम यांनी भारत दौऱ्याची सुरुवात बोधगया येथून केली, ज्यातून दोन्ही देशांतील सांस्कृतिक व आध्यात्मिक नात्यांचे महत्त्व अधोरेखित होते. त्यांच्या दौऱ्यामुळे परस्पर सहकार्याला अधिक चालना मिळणार असल्याचेही स्पष्ट झाले. दोन्ही देशांदरम्यान डिजिटल तंत्रज्ञान, आरोग्य, संस्कृती, पर्यटन, पेमेंट सिस्टीम, शिक्षण व लेखापरीक्षण यांसारख्या विविध क्षेत्रांत सहकार्याचे करार करण्यात आले.

## उसाचा हमी भाव ३६५ रु. प्रति क्विंटल राजू शेट्टी आक्रमक! केंद्रावर टीका

■ नवी दिल्ली

**ऊस** उत्पादक शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने साखर हंगाम २०२६-२७ साठी उसाचा वाजवी आणि किफायतशीर दर (एफआरपी) ३६५ रुपये प्रति क्विंटल निश्चित केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत हा निर्णय झाला. हा नवीन दर १ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होणार असून, साखर कारखान्यांना शेतकऱ्यांकडून ऊस खरेदीसाठी तो बंधनकारक असणार आहे. मात्र शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी एफआरपीवरून सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी सरकारने



आकडे सिद्ध करावे अन्यथा माफी मागावी असे आव्हान केले.

१०.२५% साखर उताऱ्यावर आधारित उसाचा एफआरपी ठरवण्यात आला असून, उताऱ्यात प्रत्येक ०.१% वाढीसाठी ३.५६ रुपये प्रति क्विंटल प्रोत्साहन, तर घट झाल्यास तितकीच कपात होणार आहे. मात्र, ९.५% पेक्षा कमी उताऱ्यासाठी कोणतीही कपात न करता शेतकऱ्यांना किमान ३३८.३० रुपये प्रति क्विंटल दर मिळणार आहे. २०२६-२७ हंगामासाठी उत्पादन खर्च सुमारे १८२ रुपये प्रति क्विंटल असून, जाहीर एफआरपी हा त्यापेक्षा सुमारे १००.५% अधिक आहे. तसेच हा दर मागील हंगामापेक्षा २.८१% ने जास्त आहे, असे केंद्र सरकारच्या वतीने सांगण्यात आले.

## गोकुळची निवडणूक ९० दिवसांत घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश


■ नवी दिल्ली

**कोल्हापुरातील** गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. येत्या ९० दिवसांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिल्याने दीर्घकाळ सुरू असलेल्या या वादाला निर्णायक वळण मिळाले आहे.

गोकुळ दूध संघाच्या संचालक मंडळाची पाच वर्षांची मुदत संपल्यानंतर नवीन मंडळ निवडून येईपर्यंत अधिकार कोणाकडे असावेत, यावरून मोठा कायदेशीर पेच निर्माण झाला होता. पूर्वीच्या नियमानुसार, नवीन संचालक मंडळ स्थापन होईपर्यंत धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार विद्यमान मंडळाकडे असत. मात्र, हा नियम रद्द करण्यात आल्याने जुन्या संचालक मंडळाचे अधिकार संपुष्टात आले आणि प्रशासक नियुक्तीचा मुद्दा पुढे आला. या पार्श्वभूमीवर दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने लोकशाही प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित केले. 'वेळेत निवडणुका होणे आवश्यक आहे', असे नमूद करत न्यायालयाने ९० दिवसांच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले.

## मध्य प्रदेशच्या श्यामला हिल्सवर भव्य श्रीराम संग्रहालय उभारणार

**मध्य प्रदेशच्या श्यामला हिल्सवर प्रभु रामचंद्रांच्या जीवनपट उलगडून दाखवणारे भव्य असे श्रीराम संग्रहालय उभारण्यात येणार आहे. श्यामला हिल्सवरील मानस भवन परिसरात १५ हजार चौरस फूट क्षेत्रफळावर ही तीन मजली संग्रहालय साकारले जाणार आहे.**



■ भोपाळ

**या इमारतीचा** दर्शनी भाग हा ओरछा येथील श्री रामराजा मंदिराची हुबेहुब प्रतिकृती असणार आहे. श्रीराम संग्रहालयासाठी तुलसी मानस प्रतिष्ठानने जमीन दान केली आहे. तर मध्य प्रदेश सरकार या संग्रहालयासाठी अपेक्षित असलेला १५ कोटी रुपयांचा खर्च उचलणार आहे. मध्य प्रदेश राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या (एमपीएसटीडीसी) वतीने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यात येणार आहे.

इमारतीच्या तळमजल्यावर प्रभु रामचंद्रांच्या चौदा वर्षांच्या वनवासातील जीवनपट उलगडून दाखवला जाईल. अयोध्येतील राजवाडा जिथे श्रीराम राजपुत्र होते आणि जिथून ते वनवासाला गेले याठिकाणी साकारला जाणार आहे. वनवासात जाताना श्रीराम शरयू नदीच्या तीरावर जिथे काही क्षण विसावले होते ते स्थळ आणि किश्किंधा नगरीचा देखावा याठिकाणी साकारला जाईल. पुढे श्रीरामांची सुग्रीव आणि हनुमान यांच्याशी झालेली भेट, सीतेचे अपहरण आणि सीतेला रावणाच्या कैदेतून सोडवून आणण्यासाठी श्रीरामचंद्र वानरसेनेच्या मदतीने सेतू बांधत असल्याचे दृश्य येथे उभे केले जाणार आहे. संग्रहालयात ऑडिओ, व्हिडिओ गॅलरी आणि मुखवटा गॅलरी असणार आहे.

## ओहायो गव्हर्नर निवडणूक प्राथमिक फेरीत रामास्वामींचा विजय

■ वॉशिंग्टन

**भारतीय** वंशाचे उद्योजक-राजकारणी विवेक रामास्वामी ओहायोच्या गव्हर्नर निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षाच्या प्राथमिक फेरीत विजयी झाले आहेत. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाला मोठे यश मिळाले आहे. गव्हर्नर पदासाठी त्यांची लढत डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार एमी ॲक्टन यांच्याशी होणार आहे. विवेक रामास्वामी हे तंत्रज्ञान आणि आरोग्य क्षेत्रातील उद्योजक आहेत. २०२४ च्या अमेरिकन राष्ट्राध्यक्ष पदाच्या शर्यतीत उतरल्यानंतर त्यांना जगभरात मोठी ओळख मिळाली होती. नंतर त्यांनी माघार घेतली. परंतु राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कट्टर समर्थक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. ओहायोमध्ये त्यांच्या विजयानंतर ट्रम्प यांनी विवेक रामास्वामी यांचे तरुण आणि हुशार नेता म्हणून वर्णन केले आहे.

## दोन दिवसांच्या स्थिरतेनंतर सोन्या-चांदीची मोठी उसळी

■ मुंबई

**सराफा** बाजारात मोठी उलथापालथ झाली असून, दोन दिवसांच्या स्थिरतेनंतर सोन्या-चांदीच्या दरांनी आज जोरदार उसळी घेतली आहे. मल्टी कमोडिटी एक्स्चेंज (एमसीएक्स)वर आज सोन्याच्या दरात तब्बल १,९६७ रुपयांची वाढ नोंदवण्यात आली. या वाढीनंतर सोन्याचा दर १,५१,७२० रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला आहे. तर चांदीच्या दरातही मोठी वाढ होऊन ती ६,१८१ रुपयांनी महागली असून २,५०,४९७ रुपये प्रति किलोवर व्यवहार करत आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीच्या दोन दिवसांत चांदीच्या दरात तब्बल १०,१०० रुपयांची घसरण झाली होती. आज पुन्हा दरात मोठी उसळी दिसून आली



आहे. त्यामुळे चांदीच्या बाजारात प्रचंड अस्थिरता पाहायला मिळत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोन्याने प्रति औंस ४,६३२ डॉलरचा टप्पा ओलांडला असून, चांदीच्या दरात सुमारे २.४९ टक्क्यांची वाढ झाली आहे.